# मृत्युचे स्मरण

خصوصی شمارہ: موت کی یاد

نومبر 20016 (No.: 480)

الرسالہ
Al-Risala

(मराठी अनुवाद)


नोव्हेंबर २०१६



मौलाना वहीदुद्दीन खान

# NON-VIOLENCE AND PEACE-BUILDING

## IN ISLAM




For other details please contact:
www.goodwordbooks.com

---

हीं पुस्तिका खालील पत्त्यावर मिळेल.

**अब्दुस समद खलिल अहेमद**

**१०५०, रविवार पेठ, पुणे - ४११००२**

**फोन नं. : 020 24472830 मोबा. नं.: 9665059035**

خصوصی شمارہ: موت کی یاد
نومبر (No.: 480) 20016

الرسالہ
Al-Risala

विशेषांक : **मृत्युचे स्मरण**
(मराठी अनुवाद) नोव्हेंबर २०१६

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ०२ |
| विचार करा.....! | ०३ |
| माणसाची कथा | ०५ |
| दूरदृष्टी | ०९ |
| जीवनाचे वास्तव | १० |
| स्वर्गाची ओळख | ११ |
| माणसाचे व्यक्तिमत्व | १२ |
| आयुर्मान आणि आरोग्य | १३ |
| वृद्धापकाळ | १४ |
| वृद्धापकाळाचे उदाहरण | १५ |
| प्रत्येक माणूस मृत्युचा प्रवासी | १६ |
| मृत्यु | १७ |
| मृत्युचे आकलन | १८ |
| मृत्युच्या प्रवेशद्वारावर | १९ |
| वेळ संपली | २० |
| मृत्युची सूचना | २१ |
| मृत्युची कल्पना | २२ |
| मृत्युचे वास्तव | २३ |
| मृत्युच्या सानिध्यात | २४ |
| मृत्युचा अनुभव | २५ |
| मृत्यु: अपराजित | २६ |
| प्रमोशनचे वृत्त | २८ |
| आत्महत्या एक वेडेपण | २९ |
| निरंतर वाळवंटात | ३० |
| मरणाऱ्याच्या आठवणी | ३१ |
| फसवणूक | ३१ |
| मृत्युची समस्या | ३२ |
| मृत्युचे दु:ख | ३३ |
| मृत्युचा संदेश | ३४ |
| मृत्युची घटना | ३५ |
| मृत्युची प्रतिमा | ३६ |
| जीवनास्वाद | ३७ |
| मृत्युची शिकवण | ३८ |
| ख्यातनाम अब्जोपती | ३९ |
| अखेरची नमाज: नमाजे जनाजा | ४० |


मुल्य : ₹ २०/-

# प्रस्तावना

मृत्यु आणि जीवन या विषयावर ही पुस्तिका आहे. अर्थात माणसाच्या जन्माचा उद्देश काय आहे. आणि मृत्युनंतर ज्यावेळी तो पुढच्या टप्प्यात दाखल होईल त्यावेळी त्याला कोणत्या प्रसंगाशी मुकाबला करावयाचा आहे. पवित्र कुरआनमधील हा एक महत्वाचा विषय आहे. निर्मात्याने यासाठी पवित्र कुरआनचे प्रकटीकरण केले, की जेणे करुन माणसास जीवनाचा अर्थ कळावा आणि त्याप्रमाणे त्याने आपल्या जीवनाचे योग्य नियोजन करावे.

प्रत्येक स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी हे प्रायोजित आहे. तो एक दिवस आईच्या उदरातून जगामध्ये प्रवेश करतो आणि त्यानंतर शंभर वर्षांपेक्षा कमी मुदतीपर्यंत जीवन व्यतीत करुन जीवनाच्या पुढील टप्प्यात प्रवेश करतो. पवित्र कुरआनमध्ये या प्रश्नाचे अत्यंत योग्य उत्तर उपलब्ध आहे. प्रत्येक स्त्री आणि पुरुषाचे कर्तव्य आहे की त्यानी सर्वप्रथम या प्रश्नाचे योग्य उत्तर जाणून घ्यावे. म्हणजे त्यानुसार जीवन व्यतीत करुन आपल्या शाश्वत जीवनाच्या निरंतर टप्प्यात यशस्वीरित्या त्याला स्थान प्राप्त होईल.

सदरहू पुस्तिका माहितीपूर्ण साहित्य वृद्धिंगत करणारी आहे. त्याचप्रमाणे विषयानुरुप या पुस्तिकेस महत्वाच्या पुस्तकात विशेष स्थान आहे, एका अर्थाने हे पुस्तक प्रबोधनकारी आहे. त्याचप्रमाणे आत्मनिरीक्षण (self introspection) करणारे आहे.

वहीदुद्दीन खान,
नवी दिल्ली
२०/१०/२०१६

हा लेखसंग्रह ‘मौत व हयात’ या पुस्तकाचा एक भाग आहे.

# विचार करा....!

जर पर्वताच्या कपारीतून एखाद्या माणसाने जन्म घेतला तर सर्व पाहाणारे आणि जाणणारे लोक ती एक आश्चर्यकारक घटना आहे असे समजतील. लोक विचार करु लागतील, असे कसे झाले? आईच्या उदरातून ते जिवंत माणसास जन्म घेताना पाहातात, मात्र त्यावर ते कधी विचार करत नाहीत.

असे का? याचे कारण आईच्या उदरातून माणसाचा जन्म होणे ही एक दररोजची घटना आहे. पुन:पुन्हा पाहिल्यामुळे लोकांना ते परिचित झाले आहे. यासाठी ते त्याला टेकन फॉर ग्रँटेड (For granted) समजतात. याबाबतीत विचार करणे त्याला आवश्यक वाटत नाही. लोकांनी जर याबाबतीत गांभिर्याने विचार केला, तर माणसाच्या जन्माच्या माध्यमातून निर्मात्याच्या अस्तित्वाची त्याना ओळख होईल. ज्यावेळी ते पाहातील, की एक जिवंत माणूस जन्मानंतर जमीनीवर चालतो, फिरतो, पाहातो, ऐकतो आणि बोलतो, त्यावेळी त्यांना समजेल, की प्रत्येक माणूस निर्मात्याच्या अस्तित्वाचा एक चालताबोलता संकेत आहे. प्रत्येक माणूस हा लोकांसाठी आपल्या पालनकर्त्याची एक ओळख आहे.

त्याचप्रमाणे माणूस ज्यावेळी जन्मास येऊन जमिनीवर प्रकट होतो, त्यावेळी त्याला आढळते, की इथे त्याच्यासाठी एक परिपूर्ण लाईफ सपोर्ट सिस्टम अस्तित्वात आहे. हे लाईफ सपोर्ट सिस्टम इतके परिपूर्ण आहे, की कोणतीही किंमत दिल्याखेरीज तो आपली कोणतीही लहानमोठी गरज चांगल्या प्रकारे भागऊ शकत नाही. जमिनीपासून सूर्यापर्यंत संपूर्ण जग माणसाच्या सेवेत आहे.

त्यानंतर तो दिवस येतो ज्या दिवशी माणसाचा अचानक मृत्यु होतो. माणूस आपल्या स्वभावानुसार शाश्वत जीवनाची अपेक्षा करतो. परंतु शंभर वर्षांच्या आतच ही घटना घडते, की स्त्री आणि पुरुष आपल्या मर्जी विरुद्ध या जगास कायमचे सोडून जातात. जमिनीवर जन्म घेणाऱ्या प्रत्येक माणसास दोन गोष्टींचा अनुभव येतो. प्रथम जीवनाचा आणि त्यानंतर मृत्युचा अनुभव. जर माणसाने गंभीरपणे यावर विचार केला, तर निश्चितपणे त्याला फार मोठ्या

सत्याचा शोध लागेल. तो असा की माणसास जन्म देऊन या जमिनीवर त्याला स्थिरावणे हे काही पालनकर्त्याचे बक्षिस नाही. ती एक कसोटी आहे. या ऐहिक जगात माणूस स्वत: आपण स्वतंत्र आहोत असे समजतो. हे स्वातंत्र्य यासाठी आहे, जेणे करुन माहित व्हावे, की कोणता माणूस आपल्या स्वातंत्र्याचा योग्य प्रकारे उपयोग करतो आणि कोणता माणूस आपल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करतो. कोणता माणूस तत्वानुसार आपले जीवन व्यतीत करतो आणि कोणता माणूस तत्व सोडून आपले जीवन व्यतीत करतो.

माणसाने गंभीरपणे विचार केला, तर तो हे वास्तव बाळगून राहील, की मृत्यु प्रत्यक्षात पालनकर्त्यासमोर  उपस्थित राहण्याचा दिवस आहे. माणूस शाश्वत आहे. परंतु त्याचे आयुर्मान दोन भागांत विभागण्यात आले आहे. मृत्युपूर्वीचे आयुर्मान (pre death period) आणि मृत्युपश्चात आयुर्मान (post death period). मृत्युपूर्वीचे आयुर्मान कसोटीसाठी आहे आणि मृत्युपश्चात आयुर्मान त्याच्या भूतकाळातील चांगल्या अथवा वाईट कृत्याप्रमाणे (रेकॉर्ड प्रमाणे) त्यास बक्षिस देण्यासाठी अथवा शिक्षा देण्यासाठी आहे.

माणूस आज स्वत:स या जगात एक जिवंत आणि बुद्धिजीवी समजतो. हे जिवंत आणि बुद्धिजीवी अस्तित्व एक शाश्वत अस्तित्व आहे. मृत्यु तो दिवस आहे, ज्यावेळी हे जिवंत आणि बुद्धिजीवी अस्तित्व ज्या परिस्थितीत नष्ट होते त्यास याच जिवंत आणि बुद्धिजीवी अवस्थेत पुढच्या कायम स्वरुपी जगाकडे परिवर्तित करण्यात येते.

हा क्षण प्रत्येक स्त्री पुरुषाच्या जीवनात निश्चितपणे येणार आहे. तो कल्पनातीत धक्कादायक क्षण आहे. मृत्युपश्चात येणाऱ्या या जीवनात तीच व्यक्ती असेल, परंतु येथील सर्व साहित्यसामग्रीपासून तो कायमचा वंचित राहील. त्याच्यामागे ते जग राहील ज्यापासून तो कायमचा विभक्त होईल. त्यानंतर ते नवीन जग असेल जेथे त्याला परिपूर्ण भौतिक साधनसामग्रीखेरीज शाश्वत जगात राहावयाचे आहे. बुद्धिमान तो आहे, जो या येणाऱ्या दिवसासाठी स्वत:ची तयारी करतो.

# माणसाची कथा

प्राणीमात्रांसाठी जीवन केवळ एकदाच आहे. परंतु माणसासाठी मात्र दुसरे जीवन आहे. प्रत्येक  मनुष्य प्रत्यक्षात शाश्वत जीवनाचा मालक आहे. या शाश्वत जीवनाचा अत्यल्प भाग ऐहिक जीवनात आहे. उर्वरित पूर्ण जीवन मृत्युपश्चात आहे.

सृष्टीच्या इतर बाबी स्वाभाविक नियमावलीनुसार आहेत. येथील प्रत्येक वस्तू या स्वाभाविक नियमावलीनुसारच कार्यरत असते. परंतु माणसाचे यापेक्षा वेगळे आहे. माणूस प्रत्यक्षात एक स्वतंत्र्य सजीव प्राणी आहे. तो आपले भवितव्य आपल्या स्वातंत्र्यानुसारच घडवतो. तो आपल्या स्वातंत्र्याचा एक तर योग्य प्रकारे उपयोग करतो, अथवा दुरुपयोग करतो. तो संधी प्राप्त करतो, अथवा त्या संधी मूर्खाप्रमाणे गमावतो.

या वास्तवाचे कुरआनमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विवेचन करण्यात आले आहे. कुरआनच्या सुर: ९५ मध्ये अल्लाहकडून प्रकट करण्यात आले आहे की, आम्ही माणसास उत्कृष्ट प्रतिकृतीत घडवले, त्यानंतर त्याला अत्यंत खालच्या पातळीवर फेकून दिले.

We created man in the best mould, then we
cast him down to the lowest of the low.

ही माणसासाठी एक सूचना आहे. यामध्ये त्याला त्याच्या सद्याच्या अवस्थेवर आणि भवितव्याबाबतीत विचार करण्याचे आवाहन आहे. याचा अर्थ असा की, पालनकर्त्याने माणसास उच्च दर्जा दिला, परंतु माणूस त्याच्या क्षमतेचा कमीतकमी उपयोग करुन स्वत:स अपयशाच्या अत्यंत घृणास्पद अवस्थेत नेऊन सोडतो.

God created man with great potential, but by under-utilizing his potential, he makes himself a worst case of failure.

माणसाचे व्यक्तिमत्व दुहेरी आहे. शरीर आणि आत्मा (अथवा बुद्धिमत्ता). वैज्ञानिकदृष्ट्या दोन्ही कार्य परस्पर विरोधी आहेत. माणसाचे शरीर

मर्त्य आहे. त्याचा आत्मा शाश्वत आहे. ऐहिक नियमांपेक्षा उच्च आहे. माणसाचे शरीर ऐहिक नियमांशी बांधलेला आहे आणि नाशवंत आहे.

जीवशास्त्राच्या विश्लेषणानुसार माणसाचे शरीर सूक्ष्म पेशींनी बनलेले आहे. या पेशी प्रत्येक क्षणी हजारोंच्या प्रमाणात नष्ट होतात. माणसाची पचनशक्ती म्हणजे पेशींचा एक कारखाना आहे. हा कारखाना पेशींचा पुरवठा करत असतो. अशाप्रकारे शरीराचे अस्तित्व कायम राहाते. ही क्रिया अशा प्रकारे होत राहाते की काही वर्षांनंतर माणसाचे शरीर एक नवीन रुप धारण करत असते. परंतु त्याच्या आत्म्याचे अस्तित्व कोणत्याही परिवर्तनाशिवाय कायम राहाते. आणि म्हणून असे म्हटले गेले आहे, की या परिवर्तनाच्या प्रक्रियेत व्यक्तीमत्व अपरिवर्तनीय आहे.

Personality is changelessness in change.

माणसाच्या अपयशाचे पहिले कारण हे आहे की तो आपल्या अदृष्य आत्म्याकडे दुर्लक्ष करतो आणि दृष्य शरीरास चांगले बनवण्याचा प्रयत्न करत असतो. तो आपले पूर्ण लक्ष विनाशकारी माणसाच्या उत्कर्षावर केंद्रिंत करतो. शाश्वत माणसाच्या उत्कर्षासाठी तो विचार करत नाही अथवा काही करत नाही. परिणामत: एका मर्यादित मुदतीनंतर ज्यावेळी तो मृत पावतो त्यावेळी त्याची अवस्था अशी होते की, त्याच्या शाश्वत अस्तित्वाचा प्रगतीविना मृत्युपश्चात जीवनात प्रवेश होतो.

कुरआनमध्ये हेच माणसाच्या अपयशाचे कारण दाखवण्यात आले आहे. नि:संशय हे घृणास्पद अपयश आहे. माणसास अतिउच्च क्षमतेसह (Potentials) निर्माण करण्यात येते. मात्र तो आपल्या गुणवत्तेचा अयोग्य मार्गाने उपयोग करतो. त्यानंतर तो नेहमीसाठी आपल्या या चुकीच्या कृत्यांची किंमत देण्यासाठी आपल्या मृत्युपश्चात जीवनात प्रवेश करतो.

माणसामध्ये विचार करण्याची क्षमता आहे. काल्पनिक विचार माणसाचा एक असा गुणविशेष आहे की जो विशाल विश्वाच्या कोणत्याही जैवविविधतेत नाही. प्राणिमात्रातदेखील नाही. त्यासाठी असे म्हटले जाते, की माणूस एक

विचार करणारा प्राणी आहे. Man is a thinking animal. या दृष्टीकोनातून पाहिले तर माणसाच्या व्यक्तीमत्वात दोन गोष्टींचा समावेश आहे. विचार न करणारे शरीर आणि विचार करणारा आत्मा (सद्सद्विवेकबुद्धि). जे लोक संभाव्य गोष्टींचा केवळ शारीरिक मर्यादिनुसार उपयोग करतात ते आपल्या शारीरिक अस्तित्वास अधिक प्राधान्य देत असतात. परंतु आपल्या आत्म्याच्या प्रगतीसाठी ते काहीच करत नाहीत. दुसऱ्या शब्दात ते मृत्युच्या पूर्वीचे सर्व जीवन शारीरिक प्रगतीसाठी व्यतीत करतात. स्वतःच्या आत्म्यासाठी ते काहीच करत नाहीत. असे लोक अशा अवस्थेत मृत्यु पावतात ज्याप्रमाणे एखादे जनावर मृत्युमुखी पडते आणि आपल्या मृत्युपश्चात जीवनात ते अशा प्रकारे प्रवेश करतात की त्यांची विचारसरणी सर्व प्रकारच्या प्रगतीपासून वंचित राहाते. मृत्युपश्चात जीवनात त्याना केवळ फार मोठ्या आशाआकांक्षांखेरीज काहीच प्राप्त होत नाही.

जगभरातील सर्व प्राणी आजच्यासाठी जीवन जगत असतात. केवळ माणूसच आपण उद्या राहाणार आहोत असे समजतो आणि उद्याचे लक्ष्य ठेऊन आपल्या जीवनाचे नियोजन करीत असतो. अर्थात इतर सर्व सजीव केवळ वर्तमानात जगत असतात. माणूस मात्र भविष्यासाठी जगत असतो.

कुरआनमधील विवेचनानुसार लोक आपल्या कौशल्याचा उपलब्ध सामग्री प्राप्त करण्यासाठी उपयोग करतात. भावी जीवनासाठी काहीच करत नाहीत. असे लोक मृत्युपूर्वीच्या जीवनात आनंदी दिसतात. परंतु मृत्युपश्चात जीवनात त्यांना काहीच प्राप्त होणार नाही आणि याचे ते अत्यंत वाईट उदाहरण असतील. कारण मृत्युपश्चात जीवनात जी गोष्ट उपयोगी पडणार आहे ती विवेक आणि आत्मा यांचा विकास आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्यामध्ये अमर्याद आशाआकांक्षा बाळगून असते. याचबरोबर प्रत्येक माणसामध्ये अमर्याद गुणविशेष आढळून येतात, ज्यांचा उपयोग करुन तो अमर्याद आशाआकांक्षा पूर्ण करु शकतो.

या संदर्भात माणसाने आपल्या जीवनाचे नियोजन अशा प्रकारे करावे की

त्याची विचारसरणी पूर्णत: मृत्युपश्चात शाश्वत जीवनासाठी असावी. क्षमतेचा त्याने विचार करावा आणि त्याप्रमाणे वर्तणूक करावी म्हणजे शाश्वत जीवनात तो लाभान्वित होईल. त्याने स्वत:स वाईट परिणामांपासून सुरक्षित ठेवावे. I was a case of a missed opportunities असे म्हणण्याचा प्रसंग त्याच्यावर येऊ नये.

मृत्युपूर्वीच्या जीवनात त्याने शारीरिक गोष्टींच्या बाबतीत आवश्यक गोष्टींवरच अवलंबून राहावे आणि त्याप्रमाणे त्याचे नियोजन असावे. त्याने आपला वेळ आणि कौशल्य अधिकाधिक उपयोगात आणावा. मृत्युपश्चात जीवनात एक पवित्र व्यक्ती (purified personality) म्हणून त्याचा प्रवेश व्हावा. म्हणजे त्याला शाश्वत जीवनाच्या परिपूर्ण जगात (perfect world) प्रतिष्ठा आणि समाधान प्राप्त होऊ शकेल. मृत्युपूर्वीच्या जीवनात आणि मृत्युपश्चात जीवनात या दोन्हीमध्ये यशाची केवळ एकच तत्वप्रणाली आहे आणि ती म्हणजे त्यासाठी माणसाने स्वत:चे व्यक्तीमत्व घडवणे. परिपूर्ण व्यक्तीसाठी मृत्युपश्चात जीवनात लाभ होईल ज्याठिकाणी या जगातील मृत्युनंतर त्याला शाश्वत राहावयाचे आहे.

ऐहिकदृष्ट्या परिपूर्ण व्यक्तीमत्व म्हणजे व्यावसायिक शिक्षण ग्रहण करणे. माणसामध्ये व्यापारी गुणविशेष आवश्यक आहेत. त्याच्यामध्ये असे गुणविशेष असावेत ज्याच्या माध्यमातून लोकांमध्ये त्याला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. माणूस त्वरित मिळणाऱ्या फायद्यास (immediate gain) अखेरपर्यंत महत्व देत असतो.

मृत्युपश्चात जीवनात यश प्राप्त करण्यासाठी परिपूर्ण व्यक्तिमत्व (prepared personality) म्हणजे आत्मिक आणि वैचारिक विकास अपेक्षित आहे. जगातील संधीचा आत्मिक आणि वैचारिक विकासासाठी उपयोग करणारा माणूस मृत्युपश्चात जीवनात प्रतिष्ठित समजला जाईल. हा असा माणूस आहे, जो आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करुन सत्याचा शोध घेत असतो. शासंकतेच्या जगात जो श्रद्धेच्याबाबतीत सत्यवचनी राहातो. जो निर्मात्यास आपल्या

जीवनाचे एकमेव माध्यम बनवतो (concern). स्वत:च्या भावनांना मोडित काढून तो पालनकर्त्याच्या श्रद्धेचा अवलंब करतो, त्याच्या मनामध्ये सत्य विचारसरणी अटळ राहाते. भावनाप्रधान मनुष्य बनण्याऐवजी पालनकर्त्याशी निष्ठावंत बनण्याचा पुरावा सादर करतो. फायद्याऐवजी तात्विक बैठकीचा अवलंब करतो. स्वत:स घृणास्पद गोष्टींपासून दूर ठेवतो आणि स्वत:मध्ये मानवतेचा उद्धार करतो आणि स्वातंत्र्य असतानादेखील समर्पणाच्या (submission) कृतीचा अवलंब करतो.

## दूरदृष्टी

रोमन साम्राज्याच्या भरभराटीच्या काळात तेथे बहुसंख्य युरोप आणि आफ्रिकेचे लोक होते. रोमच्या लोकांनी इमारती, रस्ते आणि पूल बांधले ते इतके शानदार होते की, त्यातील काही पूल दोन हजार वर्षानंतरही अस्तित्वात आहेत. रोमन कायद्यावर आजदेखील युरोप आणि अमेरीकेतील कायदे आधारित आहेत. परंतु रोमन साम्राज्य सर्वसंपन्न असूनदेखील विनाश पावले. आज त्यांचे अस्तित्व पुरातत्वकालीन अवशेषांमध्ये आहे. अथवा ग्रंथालयातील पुस्तकात, जी पुस्तके शोभेसाठी ठेवण्यात आलेली असतात. या प्रकारच्या उदाहरणावरुन माणसाने शिकवण घेतली तर त्याच्यामध्ये अहंभाव निर्माण होणार नाही. यावरुन लक्षात येते की, जो आपल्या भव्यतेच्या कालखंडात आपल्या ऱ्हासाचे चित्र पाहतो त्यालाच खरे डोळे आहेत. तो आपल्या भव्य इमारती उद्‌ध्वस्त अवस्थेतदेखील पाहू शकतो.

# जीवनाचे वास्तव

जग हे पती पत्नीचे जोडपे (pair) या तत्त्वावर आधारित आहे. इथे सर्व प्राणी जोडप्यांमध्ये अस्तित्वात आहेत. इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, (male plant, female plant). स्त्री आणि पुरुष (male animal, female animal) असे या जगाचे (world) स्वरुप आहे. निगेटिव्ह वल्ड आणि पॉझिटिव्ह वल्ड! जगामध्ये एक जोडपे ते आहे जे आयडियल आणि परफेक्ट आहे. ते सर्व प्रकारच्या मर्यादांपासून (limitations) पवित्र आहे. इथे गुणविशेष (merit) असलेल्या माणसाच्या सर्व आशाआकांक्षा पूर्ण होतील. हे परिपूर्ण जग केवळ निवडक लोकांनाच प्राप्त होईल. वर्तमान जग याच नियोजनाचा एक भाग आहे. या नियोजनानुसार वर्तमान जग (merit) च्या कसोटीवर आधारित बनवण्यात आले आहे (Selective ground). इथे जे लोक जन्मास येतात ते यासाठी जन्मास येतात की त्याना या ठिकाणी असलेल्या परीस्थितीत ठेऊन त्यांचे निरीक्षण केले जाईल आणि त्यांच्यातील कोण पुढील जगात प्रवेश करण्यास पात्र आहेत आणि कोण अपात्र आहेत हे पाहण्यात येईल. यातील पात्र लोकांची निवड करुन त्याना पुढील परिपूर्ण जगामध्ये कायमस्वरुपी ठेवण्यात येईल. इतर लोक जे या कसोटीत उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना नाकारण्यात येईल (rejected lot).

लोकांची ही निवड (Selection) कोणत्या कसोटीवर होईल? अल्लाहच्या नियोजनानुसार त्याची एकच कसोटी आहे, ती ही की स्वातंत्र्याचा दुरुपयोग कोण करतो आणि कोण त्याचा सदुपयोग करतो? प्राप्त स्वातंत्र्याचा सदुपयोग अथवा दुरुपयोग ही एकमेव कसोटी आहे. त्यानुसार लोकांच्या शाश्वत भविष्याचा निर्णय घेतला जाईल. अल्लाहच्या नियोजनानुसार योग्य व्यक्ती ती आहे, जी स्वत:स परिस्थितीच्या बंधनातून सुरक्षित ठेवते. जी व्यक्ती अल्लाहने दाखवलेल्या मार्गानुसार आपले जीवन व्यतीत करते, ती व्यक्ती मृत्युपूर्वीच्या अवस्थेत मृत्युपश्चात अवस्थेसाठी स्वत:स पात्र बनवते. सद्याच्या जगात प्रत्येक पुरुषासमोर ही कसोटी (test) आहे. अल्लाहच्या नियोजनानुसार प्रत्येक स्त्री पुरुषांचे रेकॉर्ड तयार करण्यात येते. ज्यावेळी इतिहासाच्या अखेरीस मानवाचे

पुढचे युग सुरु होईल त्यावेळी मानवाचा पालनकर्ता प्रत्यक्ष त्याच्यासमोर प्रकट होईल.

हा निर्णयाचा दिवस असेल. त्यादिवशी सर्व जन्मास आलेले स्त्री पुरुष यांना अल्लाहसमोर उभे राहावे लागेल. त्यावेळी नोंदवहीनुसार (Record) प्रत्येकाच्या शाश्वत भविष्याचा अल्लाहकडून निवाडा करण्यात येईल. हा निवाडा न्यायोचित असेल. त्यानंतर काहींना शाश्वत स्वर्गात दाखल करण्यात येईल आणि काहींना नरकात दाखल करण्यात येईल. हा अंतिम दिवस खूप जवळ आला आहे. आता अखेरचा काळ आला आहे म्हणून माणसाने जागरुक राहावे आणि येणाऱ्या शाश्वत जीवनाची त्याने तयारी करावी.

# स्वर्गाची ओळख

लॉर्डमिओ यानी आपल्या जीवनातील एका घटनेचे असे वर्णन केले आहे. ते एकदा एका बेटावर होते. त्यावेळी त्यांना सूर्यास्ताचे दर्शन घडले. ते लिहितात की, हे दृश्य इतके सुरेख होते, की मला असे वाटू लागले की मी ते सदैव पाहात राहावे.

I wish I would see this sunset for ever.

मनुष्य स्वभाव (nature) खूपच सुंदर आहे. एखादी गोष्ट पाहून माणसाचे समाधान होत नाही. माणसाची प्रवृत्ती अशी आहे, की या निसर्गास नेहमीच पहात रहावे असे त्याला वाटत असते. परंतु जीवनाच्या मर्यादा त्याला त्यापासून वंचित करतात आणि अवलोकन करण्याचे तो सोडून देतो. येथील निसर्ग म्हणजे सद्याच्या जगामध्ये स्वर्गाची एक प्रतिकृतीच. अंतिम दिवसाची ती एक झलक आहे. स्वर्गामध्ये जो आस्वाद आहे, जे संदर्भ आणि जे आकर्षण आहे याचे दूरवरुन दिसणारे दृश्य निसर्गामध्ये पाहण्यास मिळते. निसर्ग आम्हाला स्वर्गाची आठवण करुन देतो. सृष्ट्यावलोकनाद्बारे जगामध्ये माणूस स्वर्गाची झलक पूर्णतः पाहू शकत नाही. परंतु अंतिम दिवसाच्या परिपूर्ण जगामध्ये प्रत्येक माणसास ते शक्य आहे. तो स्वर्गामध्ये मर्यादेच्या अंतिम टप्प्यापर्यंत आनंद उपभोगू शकेल.

# माणसाचे व्यक्तिमत्व

ज्यावेळी एखादा विद्यार्थी रसायन शास्त्राचा पहिला धडा शिकतो, त्यावेळी त्याला माहित होते, की कोणताही पदार्थ नष्ट होत नाही. त्याचे स्वरुप बदलते. Nothing dies. It only changes its form. जसे आम्ही पाहातो की, एखादा पदार्थ भाजल्यामुळे, जळण्यामुळे, फाटण्यामुळे अथवा दुसऱ्या कोणत्याही अपघाताने नष्ट होत नाही. मात्र त्याचे रुप बदलते आणि त्याचे जगातील अस्तित्व कायम राहाते. अशाप्रकारे आम्हीदेखील आम्हास विनाश न होणारे सजीव समजावे. मृत्युस त्याचा विनाश समजण्यात येऊ नये.

ही केवळ कल्पना नाही. ही एक अशी घटना आहे जी अनुभवाने सिद्ध होते. उदाहरणार्थ पेशींच्या शास्त्रानुसार (cytology) माणसाचे शरीर लहानलहान पेशींनी (cells) बनते. ते सतत विभक्त होत असते. एक मध्यम प्रकृतीच्या माणसामध्ये त्यांची संख्या साधारण अब्जावधी आहे. ही एखाद्या इमारतीच्या त्याच ठिकाणी कायम राहाणाऱ्या विटांप्रमाणे नाही. या पेशींचे दररोज असंख्य प्रमाणात विघटन होते. खाद्यान्नामुळे त्यांच्या जागी दुसऱ्या नवीन पेशी निर्माण होतात. यावरुन असे सिद्ध होते, की साधारणतः दहा वर्षात एका शरीराचे नवीन शरीरात परिवर्तन होते. ज्या हाताने मी दहावर्षांपूर्वी एखाद्या कागदपत्रावर सही केली असेल, तो हात तसाच कायम राहात नाही. तरीदेखील माझ्या सहीचे कागदपत्र माझेच असतात. शरीरामध्ये बदल होत असला तरी आतील माणूस पूर्वीप्रमाणेच राहातो. त्याचे ज्ञान, त्याचे स्मरण त्याच्या आशाआकांक्षा, त्याच्या सवयी, त्याचे विचार त्याच्यामध्ये राहातात. त्यासाठी एका विद्धानाने म्हटले आहे, की माणसाचे व्यक्तीमत्व हे परिवर्तनात अपरिवर्तनीय आहे.

Personality is changelessness in change.

# आयुर्मान आणि आरोग्य!

मेरठ (यु.पी.) मध्ये राहणारे एक गृहस्थ. वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. ज्यावेळी पहिल्यांदा मी त्याना भेटलो त्यावेळी ते सुदृढ आणि निरोगी दिसत होते. त्यानंतर ते कर्करोगाने ग्रस्त झाले. उपचार केल्यानंतरदेखील आजार वाढत गेला आणि अंथरुणावरच पडून राहिले. शेवटीतर त्यांचा हाडांचा एक सापळाच झाला होता. त्यांची पचनशक्ती इतकी बिघडली होती, की ते हलका आहारदेखील घेऊ शकत नव्हते. पाणी पिणेदेखील खूप अवघड होऊन बसले होते. त्यावेळी कोणतीही व्यक्ती त्यांना भेटण्यासाठी आली तर ते त्यांना सांगत असत, तुम्ही माझ्याबाबतीत विचार करु नका. स्वत:बद्दल विचार करा. तुम्ही कृतज्ञता व्यक्त करा. तुम्ही जेवता, पाणी पिता आणि जमिनीवर चालता. या सर्व गोष्टी अल्लाहच्या देणग्या आहेत. ज्यावेळी त्याच्या मनात येईल त्यावेळी तो या देणग्या काढून घेईल आणि त्यानंतर तुमच्याजवळ काहीच शिल्लक राहणार नाही.

माणसास एक निरोगी शरीर बहाल करण्यात आले आहे. जन्म झाल्यानंतर हे निरोगी शरीर माणसास नैसर्गिकरित्याच प्राप्त होते. त्यासाठी तो त्याला फॉर ग्रँटेड (for granted) समजतो. तो कधी विचारही करत नाही, की हे निरोगी शरीर अल्लाहची देणगी आहे आणि या देणगीचा स्वीकार करुन मला अल्लाहपुढे शरणागती पत्करली पाहिजे. हाच प्रकार आयुर्मानाच्या बाबतीत आहे. माणूस हयात आहे, तोपर्यंत तो समजतो, की त्याचे हे जीवन शाश्वत राहील. तो कधीही आपल्या मृत्युसंबंधी विचार करत नाही. ही सगळ्यात मोठी चूक आहे.

ही प्रत्येक स्त्री आणि प्रत्येक पुरुषाची कसोटी आहे. जीवनापेक्षा मृत्युबद्दल विचार करणारीच खरी यशस्वी व्यक्ती आहे. जो प्रत्येक प्राप्त सामग्रीस अल्लाहची देणगी समजतो तो कसोटीत (test) उत्तीर्ण होतो. याउलट जी व्यक्ती अल्लाहला नाकारते आणि मृत्युस विसरते ती व्यक्ती कसोटीत अनुत्तीर्ण होते. यशस्वी माणसासाठी शाश्वत स्वर्ग आहे, तर अयशस्वी माणसासाठी शाश्वत नरक आहे.

# वृद्धापकाळ

कुरआनमध्ये अल्लाहने म्हटले आहे, काय आम्ही तुम्हाला इतके आयुर्मान दिले नाही का, की जी व्यक्ती स्मरण करु इच्छिते ती या कालावधीत स्मरण करु शकते? या संदर्भात हदिसमध्येही उल्लेख करण्यात आला आहे. हदिसमध्ये नमूद करण्यात आले आहे, की ज्या व्यक्तीला दीर्घायुष्य अथवा वृद्धापकाळ प्राप्त झाला त्याच्याजवळ अल्लाहपुढे सादर करण्यासाठी कोणतीही सबब राहात नाही. प्रथम बालपण, त्यानंतर तारुण्य आणि त्यानंतर वृद्धापकाळ असे माणसाचे जीवन आहे. वृद्धापकाळ हा सद्याच्या जगात कोणत्याही व्यक्तीसाठी अखेरचा पर्व आहे. कारण त्यानंतर मृत्यु!

या दृष्टीकोनांतून वृद्धापकाळ म्हणजे मृत्युची पूर्व सूचना (prior notice) आहे. वृद्धापकाळात शरीराचे सर्व अवयव (organs) कमकूवत होतात. काही अवयवांचे कार्य बंद होते. याचा अर्थ मृत्युची वेळ जवळ आली आहे. ती मृत्युची पूर्वसूचना (compulsory reminder) आहे. वृद्धापकाळ माणसास त्याच्या समाधीच्या काठावर घेऊन जातो.

जर माणसाची बुद्धिमत्ता सक्षम असेल तर वृद्धापकाळात तो विचार करु लागेल, “आता ती वेळ लवकरच येणार आहे की, त्यावेळी माझा मृत्यु होईल आणि मला अल्लाहपुढे माझा लेखाजोखा देण्यासाठी उपस्थित करण्यात येईल.” याप्रमाणे वृद्धापकाळाचे अनुभव माणसाच्या मनात कल्लोळ निर्माण करतात. त्याला अंतिम दिवसाची आठवण करुन देतात. वृद्धपकाळ माणसास याची आठवण करुन देतो, की या भौतिक जीवनात तुमचा प्रवास आता संपुष्टात आला आहे. आता तुम्हाला निश्चितपणे पुढच्या जीवनात प्रवेश करावयाचा आहे. त्याचप्रमाणे अल्लाहच्या न्यायालयापुढे हजर राहावयाचे आहे. नि:संशय ती व्यक्ती सर्वाधिक दुर्दैवी आहे, ज्याला वृद्धापकाळ प्राप्त झाला, परंतु ज्याने स्मरण केले नाही. तो संभ्रमात राहील आणि त्याच परिस्थितीत त्याचा मृत्यु होईल.

# वृद्धापकाळाचे उदाहरण

माणसाच्या जीवनाचे वृद्धापकाळ एक पर्व आहे. वृद्धापकाळ निरर्थक नाही. वृद्धापकाळात माणसासाठी एक संधी उपलब्ध होते. अर्थात त्यापासून एक धडा घेणे आवश्यक आहे. कुरआनच्या सुर: अल् फातिरमध्ये याचा उल्लेख आहे. ''काय आम्ही तुम्हाला इतके आयुर्मान दिले नाही का की तुम्ही जो काही विचार करावयाच्या असेल तो या कालावधीत करावा?''

या जगात माणूस अल्पकाळासाठी जन्मास येतो आणि म्हणून जन्मत:च माणसाच्या वयोमानाची वजावट सुरू होते. साधारण पस्तीस वर्षांपर्यंत त्याचा ग्राफ वाढत जातो. त्यानंतर तो खाली खाली येत राहातो. मध्यांतराचा काळ, नंतर वृद्धपकाळ आणि त्यानंतर मृत्यु! या कालावधीत त्याला संकटांचा मुकाबला करावा लागतो. उदाहरणार्थ आजारपण, अपघात इत्यादी.

अशा प्रकारे माणसाचा एक एक टप्पा कमी कमी होत जातो. प्रथम तरुणाई, त्यानंतर कमकुवत प्रकृती आणि अखेरीस समाधान! तोपर्यंत मृत्युची वेळ येऊन ठेपते आणि माणसाची सर्व साधनसामग्री, जी तो स्वत:ची समजत असतो, इथपर्यंत, की स्वत:चे शरीरदेखील त्याच्यापासून अखेरीस विभक्त होते. त्यानंतर जे काही मागे राहते ती केवळ प्रतिष्ठा! त्याखेरीज काही नाही.

मृत्यु कोणत्याही व्यक्तीसाठी सर्वाधिक गंभीर अनुभव आहे. या अनुभवाचा अर्थ असा की, माणसाने आपल्या मृत्युपूर्वीच्या कालखंडात जे कमवले, ते त्याच्यापासून कायमचे विभक्त होते. त्यानंतर त्याच्यापुढे मृत्युपश्चात जीवनाचे पर्व आहे. या दुसऱ्या पर्वामध्ये माणसास केवळ तेच उपयोगी पडेल जे त्याने पुण्य म्हणून पुढे पाठवले. या संदर्भात कुरआनमधील हश्रच्या सुर: मध्ये म्हटले आहे की, "श्रद्धावंतानो, अल्लाहाची भीती बाळगा. प्रत्येक व्यक्तीने पाहावे त्याने येणाऱ्या दिवसासाठी काय पाठवले?'' (५९:१८) वृद्धापकाळ एक उदाहरण आहे. वृद्धापकाळ तक्रार करण्यासाठी नाही.

# प्रत्येक माणूस मृत्युचा प्रवासी

हे वृत्त प्रसार माध्यमात आले आहे. टाईम्स ऑफ इंडियामध्ये ते खालील शब्दांत प्रसिद्ध करण्यात आले आहे.

British reality TV star Jade Goody who has been diagnosed with cancer, says she has started planning for her funeral, adding she wants "People to cry over me." "Most people plan their wedding. But I am planning my funeral," Goody told OK Magazine. Goody was diagnosed with cervical cancer in August, 2008 just as she prepared to appear in the Indian version of the British reality TV show celebrity, Big Brother (New Delhi, October 9, 2008, p.21)

ब्रिटनचे टी. व्ही स्टार Jade Goody या आपल्या व्यवसायात ख्यातनाम होत्या. अचानक २००८ मध्ये वैद्यकीय तपासणीत त्यांना सांगण्यात आले, की त्यांना कर्करोग झाला आहे. त्यानंतर त्यानी आपल्या भविष्यातील व्यावसायिक योजना रद्द केल्या, त्या म्हणाल्या, "आता मला मृत्युची तयारी करावयाची आहे. बहुतेक लोक विवाहाचे प्रयोजन करत असतात. मला मात्र माझ्या मृयुचे प्रयोजन करावयाचे आहे."

"Most People plan their wedding, but I am planning for my funeral"

हीच प्रत्येक स्त्री पुरुषाची कहाणी आहे. लोक जीवनात उत्सव साजरे करण्यात आनंद मानतात. मात्र मृत्यु प्रत्येकाची अखेर आहे. कधीकधी उत्सव साजरा करण्यापूर्वीच मृत्युचे आगमन होते आणि ते वर्तमान जगाचा निरोप घेऊन मृत्युपश्चात जगात प्रवेश करतात. अशा परिस्थितीत प्रत्येकाने मृत्युपूर्वी ऐहिक जीवनास केवळ एक क्षणभंगुर प्रवास समजावा. त्यांनी मृत्युपश्चात जीवनाच्या तयारीवर आपले लक्ष केंद्रित करावे. लोक वाढदिवस साजरा करतात. मात्र याचा अर्थ प्रत्येक वाढदिवस म्हणजे आयुष्यातील एक वर्ष कमी! अशा परिस्थितीत प्रत्येक स्त्री पुरुषाने प्रत्येक वाढदिवसाच्या दिवशी येणाऱ्या मृत्युचे स्मरण करावे. कारण प्रत्येक वर्षाला वाढदिवस येईलच याची शाश्वती नाही. मृत्युचे आगमन मात्र निश्चित आहे. बुद्धिवंत तो आहे, जो या मोठ्या सत्याचे स्मरण करतो. याचेच दुसरे नाव मृत्यु आहे.

# मृत्यु

मृत्यु म्हणजे काय? मृत्यु म्हणजे ज्ञात जगातून अज्ञात जगाकडे प्रयाण। ही घटना चकित करणारी आहे. परंतु माणसाची ही मानसिकता अजब आहे. तो आपल्या चारी बाजूला लोकांना मृत्युमुखी पडताना पाहातो. तरीदेखील त्याच्यावर काही परिणाम होत नाही. प्रत्येक मरणारा आपल्या अवस्थेद्वारा दुसऱ्यास दाखवून देतो की, "ज्याचा अनुभव मला येत आहे, तोच तुम्हालाही येणार आहे." तो दिवस येईल, ज्यावेळी तो आम्हाला घेऊन स्वत:स दूतांच्या सुपूर्द करील. मृत्यु प्रत्येक माणसास या 'उद्या' येणाऱ्या दिवसाची आठवण करून देतो. मृत्युचा आघात एकतर्फी आघात आहे. यामध्ये माणसाच्या अधिकारात सुपूर्द होण्याखेरीज दुसरे काही नसते. हा त्याचा एकतर्फी पराजय आहे.

मृत्यु माणसाच्या जीवनास दोन पर्वांमध्ये विभाजन करणारी मर्यादा आहे. म्हणजे मृत्यु माणसास वर्तमान जगातून भावी जगाकडे मार्गस्थ करतो. या कसोटीनंतर निवाड्याच्या प्रक्रियेत प्रवेश करावयाचा आहे. मृत्युपूर्वीच्या जीवनात माणूस सत्यास समर्पित होत नाही. सहज उद्‌भवणाऱ्या गोष्टी तो मान्य करण्यास तयार होत नाही. मृत्यु यासाठी आहे, की त्याने स्नेहबंध अथवा साहाय्यकाखेरीज समर्पित व्हावे. ज्या सत्यास त्याने प्रतिष्ठेसाठी मान्य केले नव्हते त्यास त्याने मजबुर होऊन मान्य करावे. ज्या सत्यास तो आपल्या मर्जीनुसार समर्पित होतो, त्याच्यामध्ये फेरबदल करण्यासाठी तो काहीही करू शकत नाही. माणूस आज सत्याच्या संदर्भात काही शब्द बोलण्यास प्रवृत्त होत नाही. ज्यावेळी मृत्यु येईल त्यावेळी त्याला वाटेल, की शब्दकोशातील सर्व शब्द सत्याच्या संदर्भात वापरण्यात यावेत. परंतु त्याचे शब्द ऐकण्यासाठी त्यावेळी कोणीही नसेल. माणूस आज धाडस दाखवतो. परंतु ज्यावेळी मृत्युपुढे तो हतबल होईल त्यावेळी त्याच्या समर्पणासाठी त्याचे कोणी कौतुक करणार नाही.

# मृत्युचे आकलन

लोक पाहतात की, प्रत्येक जन्मास येणारा काही निर्धारित काळानंतर मृत्यु पावतो.  असे असताना ही आश्चर्यकारक गोष्ट आहे, की कोणीही स्वत: आपल्या मृत्युबाबतीत विचार करत नाही. तो दुसऱ्याचा मृत्यु पाहातो. परंतु स्वत: आपल्या मृत्युच्या बाबतीत मात्र दुर्लक्ष करतो. सद्याच्या काळात डीएनएच्या शोधात या प्रश्नाचे उत्तर आहे. हे एक नवे वैज्ञानिक संशोधन आहे. यावर जगातील ख्यातनाम शास्त्रज्ञांनी कार्य केले आहे. यात भारताचे नोबेलपारितोषिकप्राप्त हरगोविंद खुराणा (मृत्यु २०११) यांचाही समावेश आहे. या आधुनिक संशोधनानुसार माणसाच्या शरीरात शंभर ट्रिलियन पेशी (living cells) असतात. प्रत्येक पेशीमध्ये एक अदृष्य डीएनए अस्तित्वात असतो. डीएनएमध्ये माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या बाबतीत सर्व लहानमोठ्या गोष्टींची माहिती संकलित असते. ही माहिती प्रचंड असते. जर त्या माहितीचे विघटन केले तर ती माहिती विश्वकोशातील १ दश लक्ष पानांची होईल.

One human DNA molecule contains enough information to fill a million page encyclopaedia

डीएनएद्धारा माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या बाबतीत सर्व माहिती प्राप्त होते. परंतु यामध्ये केवळ एक अपवाद आहे आणि तो अपवाद म्हणजे मृत्यु! परिपूर्ण डीएनएमध्ये मृत्युची माहिती नाही. त्याचप्रमाणे माणसाच्या सद्सद्विवेकबुद्धि (human consciousness) मध्येही मृत्युची माहिती नाही. त्यामुळे माणूस दुसऱ्यास मृत्यु होताना पाहातो, परंतु स्वत:च्या मृत्युबाबतीत विचार करत नाही. हीच माणसाची कसोटी आहे. कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु डिएनएच्या माध्यमातून येत नसतो. परंतु मृत्यु अल्लाहाच्या आज्ञेनुसार होतो. ती व्यक्ती यशस्वी आहे जी आपल्या मृत्युबाबतीत अल्लाहच्या आज्ञेनुसारच विचार करते आणि त्याप्रमाणे आपल्या जीवनाचे नियोजन करते.

# मृत्युच्या प्रवेशद्वारावर

माणूस समजतो की, तो जीवन जगत आहे. परंतु वस्तुस्थिती अशी की प्रत्येकजण मृत्युच्या प्रवेशद्वारावर उभा असतो. मृत्युची कोणतीही वेळ निर्धारित नाही. प्रत्येक क्षण मृत्युचा क्षण होऊ शकतो. माणसाचे प्रत्येक पाऊल मृत्युकडे जाणारे पाऊल आहे. जीवन प्रत्येक माणसासाठी केवळ 'आजचा' अनुभव आहे. प्रत्येक माणसासाठी जीवनाचा 'आजचा' दिवस आहे. 'उद्याचा' दिवस मृत्युचा दिवस आहे.

मृत्यु माहित असलेल्या जगामधून माहित नसलेल्या जगाकडे जाणारा प्रवास आहे. माणूस दररोज प्रवास करतो. कधी लहान, तर कधी मोठा! कधी देशांतर्गत, तर कधी देशाबाहेर. हे सर्व प्रवास एक माहित असलेल्या ठिकाणाहून दुसऱ्या माहीत असलेल्या ठिकाणाकडे घेऊन जाणारे आहेत. या प्रकारचा प्रवास इतका परिचित झाला आहे, की त्याला कोणीही गंभीर समजत नाही.

परंतु मृत्युच्या प्रवासाचा प्रकार याहून भिन्न आहे. मृत्युच्या प्रवासात माणूस एका माहित असलेल्या जगाला सोडून दुसऱ्या माहित नसलेल्या जगाकडे प्रयाण करतो. ही प्रत्येक माणसासाठी नि:संशय एक गंभीर बाब आहे. परंतु माणूस या परिस्थितीमुळे त्याच्या गांभीर्याची कल्पना करू शकत नाही. तो जगामध्ये ज्या प्रवासांचा अनुभव घेतो त्याच्याशी तो इतका परिचित होतो की, तो मृत्युच्या प्रवासाचा अर्थ समजू शकत नाही. याच कारणामुळे मृत्यु म्हणजे एक दीर्घकालावधीचे वृत्त असे समजण्यात येते. ते लवकर येईल असे वाटत नाही.

माणूस नेहमी आपल्या स्वभावानुसार परिस्थितीजन्य विचार करतो. हेच माणसाच्या अनाकलनाचे मोठे कारण आहे. मृत्युच्या गांभिर्यास समजण्यासाठी माणसाने आपल्या वैचारिक बैठकीत बदल करणे आवश्यक आहे. त्याने पहिल्या गोष्टीपासून बाहेर येऊन मृत्युचा विचार करावा. त्याने जागरूक व्हावे. त्यानंतरच माणसास मृत्युचे सत्य उमगेल. नि:संशय प्रत्येक माणसासाठी ही गंभीर बाब आहे.

# वेळ संपली

शाळेत विद्यार्थ्यांची परीक्षा होते. विद्यार्थी आपली उत्तरपत्रिका लिहितात. परीक्षेची वेळ संपते. त्यानंतर शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याला सूचना देतात. "वेळ संपली. लिहिणे थांबवा.'' Stop writing, time is over. परीक्षेच्या वर्गातील हाच प्रकार आयुष्याच्या बाबतीतदेखील आहे. या जगामध्ये प्रत्येकजण परीक्षेच्या एका मोठ्या वर्गात आहे. येथे प्रत्येकजण आपली परीक्षा देत आहे. प्रत्येकाची एक वेळ निर्धारित आहे. ही वेळ पूर्ण होताच अल्लाहचा दूत येतो आणि तो सूचना देतो.'' तुमच्या जीवनाची घटका भरली आहे. आता तुमचा मृत्यु होणार आहे. मृत्युपश्चात आपल्या पालनकर्त्यासमोर तुम्हाला तुमचा लेखाजोखा देण्यासाठी हजर रहावयाचे आहे.'' परीक्षेत प्रत्येक विद्यार्थ्यांस जो अनुभव येतो त्याचेच हे उदाहरण आहे. याचप्रमाणे प्रत्येकजण जीवनाच्या परीक्षेबाबतीत विचार करू शकतो. जीवन एक परीक्षा आहे आणि मृत्यु या परीक्षेच्या निकालाचे नाव आहे. माणसास आपल्या कृत्याचा मोबदला प्राप्त करण्यासाठी मृत्युपश्चात जगात पाठवण्यात येईल. मृत्युच्या पूर्वीचे जीवन वास्तविक एक परीक्षा आहे. जी व्यक्ती विचारपूर्वक जीवन व्यतीत करील त्याला मृत्युपश्चात जीवनात चांगला परिणाम प्राप्त होईल. जे लोक या बाबतीत गाफील आहेत त्याना मृत्युपश्चात जीवनात अपेक्षा आणि औदासिन्य याखेरीज काही दिसणार नाही.

परीक्षेच्या वर्गात विद्यार्थ्यांची जी मानसिकता असते त्याच मानसिकतेप्रमाणे आम्हाला आमचे पूर्ण जीवन जगावे लागते. प्रत्येकास प्रयत्न करावा लागेल, त्याने अल्लाहकडून दिल्या गेलेल्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची योग्य उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे परीक्षेनंतर ज्यावेळी त्याचा निकाल समोर येईल त्यावेळी त्याला यशाची शुभवार्ता कळेल, अपयशाचे वृत्त नाही!

# मृत्युची सूचना

एका व्यक्तीचे वय ७५ वर्षे झाले. सुरूवातीच्या काळात त्याचे आरोग्य चांगले होते. परंतु त्यानंतर त्याला आजारपणाने घेरले. हे आजारपण त्याच्यासाठी मृत्युची चाहूल होती. परंतु तो आजारपणास केवळ उपचाराची बाब समजू लागला. त्याने डॉक्टर आणि दवाखान्याशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. ज्यावेळी त्याच्या जवळचे पैसे संपले, त्यावेळी त्याने कर्ज घेऊन स्वत:वर उपचार सुरू ठेवला. मात्र त्याचे आजारपण वाढतच गेले. काही वर्षांनंतर त्याचा मृत्यु झाला. ही एका व्यक्तीची कथा नसून प्रत्येक स्त्री पुरुषाची कथा आहे.

वृद्धापकाळ म्हणजे व्यक्तीसाठी मृत्युजवळ आला आहे याची सूचना. ज्यावेळी तो आजारपणाने घेरला जातो त्यावेळी ते आजारपण केवळ त्या माणसास विकलांग करण्यासाठी असते. ही अवस्था यासाठी की जर व्यक्ती झोपली असेल तर तिने जागे व्हावे आणि जर ती झोपली नसेल तर उठावे. जर उठता आले, तर त्याने चालावे. वृद्धापकाळ आणि वृद्धापकाळानंतर येणारा अशक्तपणा आणि आजारपण यामागे माणसाने सावधान राहावे  हा हेतू आहे. त्याने मृत्युपूर्वी मृत्युची तयारी करावी. त्याने मृत्युपश्चात येणाऱ्या परिस्थितीवर विचार करावा आणि त्यानुसार आपले उर्वरित आयुष्याचे नियोजन करावे.

परंतु माणूस या घटनांपासून काही धडा घेत नाही. वृद्धापकाळ आणि आजारपण त्याला मृत्युची वार्ता देतात. परंतु तो मृत्युच्या बाबतीत विचार करण्याऐवजी केवळ उपचार करण्याबाबतीत विचार करतो. डॉक्टर आणि दवाखान्याकडे तो धावत असतो.  अखेर निराश होतो आणि त्याचा मृत्यु होतो. पुन्हा एकदा त्याला जे प्राप्त होते ते आरोग्य  नसून मृत्यु आहे.

ही एक अशी घटना आहे. जी प्रत्येक व्यक्ती दररोज आपल्या परिसरात पाहात असते. परंतु कोणतीही व्यक्ती त्यापासून धडा घेत नाही. याबाबतीत प्रत्येक व्यक्ती आंधळी झाली आहे. ती केवळ या प्रतीक्षेत आहे की, मृत्युने डोळे उघडावेत. परंतु मृत्युपश्चात डोळे उघडणे कोणत्याही स्त्री किंवा पुरुषासाठी उपयोगाचे नाही.

# मृत्युची कल्पना

'मृत्यु' (death) चा शब्द जर तुम्ही शब्दकोशात पाहिला तर त्यामध्ये मृत्युचा अर्थ Permanent cecession of life असा देण्यात आला आहे. मृत्युचा हा शब्दकोशातील अर्थ म्हणजे मृत्युच्या विरूद्ध कल्पना आहे. याचा अर्थ असा होतो की माणसाने परिपूर्ण माणूस म्हणून जन्मास यावे आणि मृत्युसाठी जिवंत राहून तो कायमस्वरूपी नष्ट व्हावा. त्याच्या सर्व आशाआकांक्षा आणि त्याचे गुणविशेष अशाप्रकारे संपुष्टात यावेत, की पुन्हा: त्या अस्तीत्वात येऊ नयेत.

इस्लाम धर्मात जीवनासंदर्भात योग्य कल्पना मिळते. इस्लामनुसार मृत्यु जीवनाचा अंत नाही. मृत्युाचा अर्थ माणसासाठी त्याच्या जीवनाच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात आहे.

Death is not the end of life. Death marks the beginning of the second phase of human life.

इस्लामनुसार मानवास शाश्वत प्राणी (eternal being) म्हणून जन्म देण्यात आला आहे. त्यानंतर त्याचे आयुर्मान lifespan दोन विभागात विभागले गेले. मृत्युपूर्वीचे पर्व आणि मृत्युपश्चात जीवनाचा पर्व! पहिला पर्व तयारी करण्याचा पर्व आहे. मृत्युपश्चात जीवनाचा पर्व त्या तयारीनुसार आपले भवितव्य प्राप्त करणारा पर्व आहे.

निर्मात्याच्या नियोजनाप्रमाणे माणसाने मृत्युपूर्वीचे जीवन तयारीचे पर्व (prepared period) समजावे. आणि त्यास परिपूर्ण पद्धतीने व्यतीत करावे. कारण मृत्युपश्चात जीवनात त्याला काही कर्तव्य करावयाचे नाही. केवळ त्यास त्याने केलेल्या कृत्यांचा मोबदला प्राप्त करावयाचा आहे. मृत्युची घटना जीवनाचा संदेश आहे. तो असा आहे, की जे करावयाचे आहे ते 'आजच' करा. कारण 'उद्याच्या दिवशी' ते करण्यासाठी वेळ मिळणार नाही.

# मृत्युचे वास्तव

'कुल्लुनफ्सिन्जाइकतुल्मौति' असे पवित्र कुरआनातील सूरः इमरान (३:१८५) मध्ये म्हटले आहे याचा अर्थ प्रत्येक आत्म्यास मृत्युची चव चाखावी लागणार आहे. माणूस जीवनाच्या आस्वादात जगत असतो. मात्र अखेरीस मृत्यु हाच खरा आस्वाद (प्रारब्ध) आहे. इतर सर्व प्रकारचा आस्वाद त्याच्या तुलनेत नगण्य आहे. हदिसमध्ये सांगण्यात आले आहे की सर्व आस्वादांवर मात करणाऱ्या मृत्यूचे भरपूर स्मरण करा. चव अथवा आस्वाद याचा या ठिकाणी मर्यादित अर्थ नाही. अत्यंत प्रभावी अर्थ आहे. माणूस हा आस्वाद अथवा आनंद उपभोगणारा (pleasure seeking animal) प्राणी आहे. प्रत्येक गोष्टीत त्याला आनंद मिळतो. आहारात, चांगला पेहराव करण्यात, घर बांधण्यात, चांगल्या वाहनाने प्रवास करण्यात, मनोरंजक मैफिलीत सहभागी होण्यात, मानपानाच्या जागेवर बसण्यात इ.

अशा प्रकारचा सर्व गोष्टींमध्ये माणसास अमर्याद आनंद मिळतो. मात्र मृत्यु येताच या सर्व गोष्टी त्याच्यापासून हिसकावून घेतल्या जातात. ज्यावेळी एखादा माणूस दुसऱ्याची नालस्ती करतो, त्यावेळी तो स्वतःस मी कोणीतरी उणिव नसलेला माणूस आहे असे समजून आनंदित होतो. ज्यावेळी तो दुसऱ्या माणसास अपमानित करतो त्यावेळी त्याचा अहंभाव (ego) त्याला समाधान देऊन जातो. जर दुसऱ्याच्या मालमत्तेवर त्याने बेकायदेशीरपणे कब्जा केला तर त्यात तो स्वतःस हुशार समझतो. परंतु जर त्याचा विश्वास बसला की मृत्युचा दूत कधीही येऊ शकतो आणि अचानक त्याचे जीवन संपुष्टात आणू शकतो तर मृत्युपूर्वीच त्याचा मृत्यु झाला आहे. असे त्याला वाटेल.

# मृत्युच्या सानिध्यात

२ फेब्रुवारी, २००३ रोजी सर्व वृत्तपत्रात एकच प्रमुख वृत्त होते. 'अमेरिकेच्या' शटल कोलम्बियाचे भयंकर स्फोटाने तुकडे झाले.'

कोलम्बिया हा २८ वा अंतराळ प्रवास होता. अमेरिकेचे हे अंतराळातील शटल कोलम्बिया जमीनीवर उतरणार होते. ताशी १९ हजार किलोमीटर गतीने ते दोन हजार फूट उंचीवरून जमीनीकडे झेपावत होते. अचानक जमीनीवरील नियंत्रण कक्षाबरोबर त्याचा संपर्क तुटला आणि एकच स्फोट होऊन त्याचे तुकडे झाले. यावेळी त्यामध्ये आठ प्रवासी होते. ते सर्व मृत्युमुखी पडले. दिल्ली येथून प्रसिद्ध होणाऱ्या टाईम्स ऑफ इंडियाच्या आवृत्तीत या वृत्ताचे शीर्षक होते, घरांपासून केवळ १६ मिनिटांच्या अंतरावर!

Just 16 Minutes from Home!

प्रत्येक व्यक्तीची या जगात अशीच अखेर आहे. प्रत्येक माणूस आपल्या स्वप्नांचे एक घर (dream home) बनवत असतो. ज्यामध्ये आनंदी जीवन जगण्याची त्याची इच्छा असते. परंतु या घरापासून केवळ १६ मिनिट दूर असताना त्याला अचानक मृत्युसामोरे जावे लागते. या जगात त्याने बनवलेल्या घरामध्ये प्रवेश करण्यापूर्वीच त्याची अंतिम दिवसाच्या न्यायालयाकडे रवानगी करण्यात येते.

या अंतराळ शटलमध्ये ख्यातनाम कल्पना चावला, वय ४१ होत्या. त्यांचा जन्म कर्नाल येथे झाला होता. भारतातील सर्व लोक त्यांच्या परतीची प्रतीक्षा करीत होते. सर्व नात्यागोत्यातील मंडळी त्यांच्या स्वागतासाठी अमेरिकेस पोहोचले होते. जर कल्पना चावला सुरक्षित परतल्या असत्या तर त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले असते. परंतु मृत्युमुळे शोकांतिकेत त्यांचा प्रवास खंडित झाला. बोध घेण्यासारखी ही घटना आहे.

# मृत्युचा अनुभव

ख्यातनाम टेनिसपटू मार्टिना नवरातिलोव्हा (Martina Navaratilova) वैद्यकीय तपासणीसाठी एका डॉक्टरांकडे गेली. डॉक्टरांनी वैद्यकीय तपासणी केल्यानंतर सांगितले, "तुला कॅन्सर झाला असून तो दुसऱ्या अवस्थेत आहे." डॉक्टरांनी निदान जाहीर केल्यानंतर मार्टिना म्हणाली, हे वृत्त माझ्यासाठी ९/११ सारखे आहे. 'It was such a shock for me. It was my 9/11.' मृत्यु तिला अगदी नजिक दिसत होता. त्यामुळे मार्टिनाची अशी प्रतिक्रिया होती. परंतु मृत्युपश्चात जी परिस्थिती आहे ती यापेक्षा गंभीर आहे. पवित्र कुरआननुसार मृत्यु म्हणजे साधनसामग्री आणि नात्यागोत्यास पूर्णत: सोडून देणे असा आहे. मृत्युनंतर माणूस अचानक दुसऱ्या जगात प्रवेश करतो. या ऐहिक जगापासून हे दुसरे जग पूर्णपणे वेगळे आहे. मृत्युनंतर माणसाला अचानक दोन गंभीर बाबींचा मुकाबला करावा लागेल. पहिले हे की जीवनाच्या पहिल्या पर्वात तो पुन्हा परत येऊ शकत नाही, जिथे त्याने आपले जीवन घडवले होते. दुसरी गोष्ट अशी की, मृत्युपश्चात जीवनातील पर्वात तो स्वत:साठी एक नवीन जग तयार करू शकत नाही. हा विचार माणसाला शाश्वत आशाअपेक्षा यामध्ये अस्वस्थ करीत राहील. नि:संशय शाश्वत औदासिन्य यासारखा कोणताही भयावह अनुभव नाही.

सध्याच्या जगामध्ये जर एक संधी गमावली तर त्यानंतर त्याला दुसरी संधी (second chance) मिळते. त्या माध्यमातून तो अपयश  पुन्हा यशात परिवर्तित करू शकतो. परंतु अंतिम दिवसात असे होणे शक्य नाही. माणसास स्वत:साठी  पहिली संधी, दुसरी संधी अथवा तिसरी संधी केवळ याच भौतिक जगात प्राप्त होते. मृत्युपश्चात जीवन यापेक्षा अगदी वेगळे आहे. मृत्युपश्चात जीवनांत केवळ परिणाम आहे. तेथे पुन्हा नवीन सुरूवात प्राप्त होणार नाही.

# मृत्यु : अपराजित

> सम्राटचा आदेश होता, की मृत्यु हा शब्द त्याच्यासामोर कोणी उच्चारु नये. मात्र ६० व्या वर्षी त्याच्या लक्षात आले, की कोणतीही व्यक्ती मृत्युवर विजय प्राप्त करु शकत नाही.

स्पेनचे हुकूमशहा फ्रॅन्को बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. आजारपणाशी संघर्ष केल्यानंतर अखेरीस त्यांनी या जगाचा निरोप घेतला. फ्रॅन्को यांचे आयुर्मान वाढावे म्हणून स्पेनच्या डॉक्टरांनी रात्रंदिवस प्रयत्नांची शिकस्त केली. आणखी काही दिवस त्यांना जिवंत ठेवता आले असते का? यावर स्पेनमध्ये उलटसुलट चर्चा झाली. त्याला काही आठवण्या आधीच मृत्यु आला असता तर ते हरले असते. हे डॉक्टरांचे म्हणणे योग्य होते का? सर्व प्रकारचे वैद्यकीय सुविधा त्यांना देण्यात आल्या होत्या. डॉक्टर त्यांच्या अवयवांना जिवंत ठेवत होते. ही गोष्ट नीतीमत्तेस धरुन आहे का की, समाजाच्या एखाद्या नेत्याचे जीवन अशा प्रकारे वाढवण्यात यावे. वैद्यकीय क्षेत्रात या विषयावर सखोल चर्चा होऊ शकते.

अलिकडच्या काळात यावर एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यासाठी १३ वर्षे लागली. ख्यातनाम लेखक पार्ल मेरे केन्डॉल यांनी हे पुस्तक फ्रांन्सचा ११ वा सम्राट लुई याच्याबद्दल लिहिले आहे. लुईचे निधन होऊन ५00 वर्षे झाली. लुई हा असा सम्राट होता ज्याला मरावेसे वाटत नव्हते. आपले आयुर्मान वाढावे म्हणून त्याने खूप प्रयत्न केले.

लुईचे मध्यवर्ती सरकार खूप मजबूत होते. मात्र डोळे बंद झाल्यानंतर जनता अराजकतेच्या आहारी जाईल असे त्याला वाटत होते.लुईचे वय ५८ वर्षांचे होते. त्यावेळी त्याला अर्धांगवायूचा झटका आला. त्याच्या परिवारामध्ये कोणी ६0 वा वाढदिवस साजरा केला नव्हता.

आता एखाद्या सुरक्षित किल्ल्यामध्ये शांततापूर्वक जीवन जगण्याची विकलांग लुईची इच्छा होती. तो एका महालात राहू लागला. महालात काही लोकांनाच प्रवेश देण्यात येत असे. महालाकडे जाणाऱ्या मार्गावर झाडी

वाढवण्यात आली होती. ४० तिरंदाज दगडी भींतीवर बसून आपली ड्युटी करत होते. त्यांना आदेश देण्यात आला होता की, जर कोणी परवानगी शिवाय महालात प्रवेश करण्याचे धाडस केले तर त्याची कत्तल करण्यात यावी.

आपल्या वृध्दापकाळात लुई प्रत्येकाबद्दल शंका व्यक्त करु लागला. आपल्या कर्मचाऱ्यांना काढून त्यांच्या जागी त्याने परकीयांची भरती केली. त्यानंतर त्याची सेवाशुश्रूषा करणाऱ्यांमध्ये त्याने अदलाबदल करण्यास सुरुवात केली. तो त्यांना सांगत असे की परिवर्तन निसर्गास खूप पसंत आहे. लेखकाने दिलेला हा वृत्तांत आहे :

"आपण अद्याप जिवंत आहोत हे जाहीर करण्यासाठी त्याने सर्व प्रकारच्या उपाययोजना केल्या. तो अधिकाऱ्यांना निलंबित करत होता, त्यांच्याजागी नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करत होता. एखाद्याचे वेतन तो कमी करत असे, तर एखाद्याचे वेतन वाढवत असे. तो अधिकाऱ्यांच्या अदलाबदलीतच आपला वेळ घालवत होता."

मात्र हे सर्व समाधानकारक नव्हते. प्रकृती स्वास्थासाठी लुई आशावादी होता. त्याने असा आदेश दिला होता की, त्याच्या समोर 'मृत्यु' हा शब्द कोणी उच्चारु नये. त्याची वैयक्तिक देखभाल एक नोकर करत होता. लुईला त्याचे काम पसंत होते. त्याला दहा हजार सोन्याची नाणी इतके वेतन दिले जात होते. २३ जुलै, १४८३ रोजी लुईचा ६० वा वाढदिवस होता. लुई त्यामुळे अधिकच व्याकुळ झाला.

त्याला एक कल्पना सुचली. त्याने सोन्याची हजारों नाणी जर्मनी, रोम इ. देशातील चर्च आणि धार्मिक ठिकाणी वाटप करण्यास सुरुवात केली. त्याने ३ सागरी जहाज देऊन आपल्या एका सर्वोत्तम कप्तानास एका बेटावर पाठवले, तेथून मोठमोठे कासव मागवले. कासवामुळे जीवन प्रदान होते असे त्याला कोणीतरी सांगितले होते.

अशा प्रकारे सर्व प्रयत्न करुनदेखील सम्राट लुईचे पक्षाघाताने ३० ऑगस्ट रोजी निधन झाले. त्याचे अखेरचे शब्द होते. "मी काही इतका आजारी

नाही जसा तुम्ही विचार करता."

फ्रान्सच्या लोकांना चांगले माहित आहे की, त्यांचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज पोपिडो यांचा कॅन्सरच्या विकाराने मृत्यु होत असताना त्यांनी अंतिम क्षणी हेच वाक्य उद्धारले होते. "मी काही इतका आजारी नाही, जसा तुम्ही विचार करता." थोड्याच दिवसात त्यांचे निधन झाले.

अशा प्रकारे ११ व्या लुईला हे कळून चुकले की कोणतीही व्यक्ती मृत्युवर विजय प्राप्त करु शकत नाही.

# प्रमोशनचे वृत्त

एका व्यक्तीची भेट झाली. त्याने सांगितले, ''मला प्रमोशन मिळाले आहे. मला आता जास्त वेतन मिळेल. राहण्यासाठी मोठे घर मिळेपर्यंत वापरण्यासाठी मला मोठी गाडी देण्यात येईल. यापूर्वी मला प्रवासासाठी पास दिला जात होता. आता मला प्रवासासाठी विमानाचे तिकीट मिळेल.'' हे ऐकून मी विचार केला की हा अंतिम दिवसाचाच प्रकार आहे. स्वर्गाच्या संदर्भात जगाच्या भाषेत असेच वर्णन केले जाते. स्वर्गाचा प्रकारदेखील प्रमोशन सारखाच आहे. ज्या लोकांचे रेकॉर्ड सद्याच्या या अपूर्ण जगामध्ये चांगले असेल त्याला प्रमोट करून अंतिम दिवशी मृत्युपश्चात परिपूर्ण जगात प्रवेश देण्यात येईल.

यावरून लक्षात येते, की माणसाने जागरूकतेने या जगात राहावे. प्रत्येक बाबतीत त्याने याच दृष्टीकोनांतून पाहावे. अशा प्रकारे ज्या माणसाची विवेकबुद्धी जागरूक राहील, तो स्वत:च चौकस बनेल. तो आपला विचार आपले संभाषण, आपली वर्तणूक यांचे सातत्याने निरीक्षण करत राहील. तुम्ही स्वत:चे या जगामध्ये मूल्यमापन केल्यास त्याप्रमाणे अंतिम दिवशी तुमचे मूल्यमापन करण्यात येईल.

प्रमोशनच्या वृत्ताप्रमाणेच आवाहन करणे हेदेखील एक वृत्त आहे. जर एखाद्या व्यक्तीस सत्य उमगले तर ती बाब नोकरीतील प्रमोशनच्या वृत्तापेक्षा फार मोठी असेल. जर एखाद्याने असा दावा केला, की त्याला सत्य उमगले आहे आणि जर त्या परिस्थितीत त्याने अल्लाहच्या आवाहनास प्रतिसाद दिला नाही तर असे सिद्ध होते, की त्यास सत्य उमगले नाही.

# आत्महत्या एक वेडेपण

आत्महत्या म्हणजे वेडेपणा! कारण माणूस त्यावेळी आत्महत्या करतो ज्यावेळी तो एखादे कृत्य करण्यामध्ये अधिक यश मिळविण्याच्या नादात असतो. सत्य हे आहे की, आत्महत्या ही कोणत्याही व्यक्तीसाठी सर्वाधिक अवघड बाब आहे. कोणतीही व्यक्ती सामान्य परिस्थितीत स्वत:ला मारण्यासाठी तयार होत नाही. मग एखादी व्यक्ती आत्महत्या करण्यासाठी का प्रवृत्त होते. याचे कारण हे की माणसास एखाद्या गोष्टीचा झटका येतो. स्वाभाविकच तो आपल्या विचारसरणीतील सुप्त क्षमतेस, मुक्त (release) करतो. यावेळी अशा व्यक्तीचे सामर्थ्य खूप वाढते. हे वाढलेले सामर्थ्य त्याच्यापुढे आलेल्या समस्येशी संघर्ष करण्याच्या सामर्थ्यापेक्षा अधिक असते. मात्र या वाढलेल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करून तो आत्महत्या करतो. हेच कारण आहे की तो आत्महत्या करण्यासाठी पाऊल उचलतो. परंतु काही कारणामुळे मृत्यु झाला नाही तर त्यानंतरच्या जीवनात अधिक मोठे काम करण्यासाठी असा माणूस अधिक सक्षम होतो. आत्महत्या करण्यासाठी उचललेले पाऊल त्याला अधिक बळ देते. त्यामुळे मृत्यु टळल्यास तो या अधिक वाढलेल्या क्षमतेचा प्रमाणात उपयोग करतो आणि अधिक मोठे यश प्राप्त करतो.

माणसाच्या बहुतेक चुका स्वभावाचे आकलन न झाल्यामुळे होतात. स्वभावाच्या नियमानुसारच माणसाच्या विचारसरणीत त्याची क्षमता सुप्त असते. ज्यावेळी एखादी अवघड गोष्ट समोर येते त्यावेळी या सुरक्षित क्षमतेस वाट मिळते. वास्तविक पाहाता माणसास जर त्याच्या स्वभावाची ओळख झाली तर तो अनेक मूर्खपणाच्या गोष्टींपासून स्वत:चा बचाव करू शकतो. अपयशामुळे त्याची मानसिकता विचलित होऊ शकत नाही.

# निरंतर वाळवंटात

टाईम्स ऑफ इंडियाच्या दिल्ली आवृत्तीत (९ फेब्रु. २००८) एक वृत्त देण्यात आले होते. ख्यातनाम ॲक्टर आनंद सूर्यवंशी यांनी आपली मोठी कार गोरेगाव येथील 'पे ॲण्ड पार्क' (pay and park area) मध्ये उभी केली होती. काही वेळानंतर ते परत आले. त्यावेळी त्यांची कार तेथे नव्हती. ती चोरीस गेली होती. त्यांनी वृत्तपत्राचे रिपोर्टर रोशनी ऑलीव्हेरा (Roshni Olivera) यांना सांगितले, "या कारमध्ये माझ्या वैयक्तिक वस्तू होत्या. उदा. लॅपटॉप, मौल्यवान खड्याच्या अंगठ्या, डी.व्ही.डीज, पन्नास एक सी.डी.ज, शूटिंग्जचे कपडे, मोबाईल फोन आणि वैयक्तिक डायरी इत्यादी." आनंद पुढे म्हणाले, "या वस्तूंशी माझा भावनिक संबंध होता." (I was emotionally attached to it). हे सविस्तरपणे सांगताना अत्यंत विवष आवाजात ते म्हणाले की, या घटनेनंतर मला असे वाटले जसे की मी अचानक एका निर्मनुष्य वाळवंटात येऊन फसलो आहे. I feel like I am stranded on some island. अशाच प्रकाराशी अंतिम दिवशी माणसास मुकाबला करावा लागेल. मृत्युपूर्वी माणूस विविध प्रकारच्या साधनसामग्रीत आपले जीवन व्यतीत करीत असतो. गाडी, संतती, संपत्ती, व्यापार, प्रसिद्धी, बँक बॅलन्स इ. मृत्युपश्चात जीवनात माणसाचा अचानक एका नवीन जगात प्रवेश होईल. इथे तो पूर्णत: एकटाच असेल. ऐहिक साधनसामग्रीपासून तो वंचित असेल. भौतिक जगाशी त्याचा संबंध पूर्णत: तुटलेला असेल. त्याच्यासमोर शाश्वत वाळवंटाखेरीज काहीच राहणार नाही. मृत्युपूर्वी या येणाऱ्या दिवसाबद्दल माणूस विचार करू शकत नाही. मृत्युनंतर अचानक हा दिवस येईल. एखादा माणूस विचार करील, परंतु त्याचा हा विचार त्याच्यासाठी काहीच उपयोगाचा नसेल. सर्वात मोठे उदाहरण हे आहे की माणसाने या येणाऱ्या भयानक दिवसासाठी तयारी करावी.

# मरणाऱ्याच्या आठवणी

ज्या वेळी एखादी व्यक्ती मृत्यु पावते त्यावेळी त्याच्या स्मरणार्थ आठवणी प्रसिद्ध केल्या जातात. त्याच्या स्मरणार्थ समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये त्याने केलेले कार्य आणि त्याचे मोठेपण याचे वर्णन केले जाते. हा प्रकार दिशाभूल (misleading) करणारा आहे. कोणीही मृत्यु पावतो, त्यावेळी तो आपले सर्व मोठेपण इथेच सोडून जातो. मृत्यू त्याला अशा जगात सोडून जातो ज्या ठिकाणी तो एकटाच असतो. सर्व बोलणारे आणि लिहिणारे मात्र मृत पावलेल्या व्यक्तीच्या वर्तमान (present) अवस्थेबद्दल काहीच बोलत नाहीत. ते केवळ त्याच्या भूतकाळातील (past) गोष्टींचे वर्णन करत असतात. मृत्यु पावणारा मात्र या सर्वांपासून मुक्त झालेला असतो. मृत्यु म्हणजे पूर्णत: अलिप्त (detachment) होणे. याचाच अर्थ माणूस आपल्या जीवनातील पहिली संधी (first chance) गमावतो. दुसरी संधी मात्र कोणासही मिळत नाही. प्रत्येक मरणारा माणूस जीवनाच्या गंभीर बाबीकडे लक्ष वेधतो. परंतु हीच ती बाब आहे, ज्याचे वर्णन लेखनात अथवा भाषणात केले जात नाही. मरणाऱ्याने केलेल्या मोठ्या गोष्टीसंबंधी वाचून अथवा ऐकून असे वाटते की त्याचे आजदेखील याच गोष्टींवर प्रभुत्व आहे. परंतु हे शक्य नाही. वक्ते आणि श्रोते यांच्यानुसार मरणारी व्यक्ती ही ऐतिहासिक असते. परंतु मरणाऱ्याची अवस्था अशी असते. की तो लाचार होऊन पडलेला असतो.

# फसवणूक

प्रत्येक काळांमध्ये 'म्हणी' आणि वाक्प्रचार असतात हे 'वाक्प्रचार' किंवा म्हणी माणसाच्या जीवनातील अनुभवावर अवलंबून असतात. अशाच प्रकारचा एक इंग्रजी वाक्प्रचार आहे. ही गोष्ट इतकी चांगली आहे की ती सत्य होऊ शकत नाही. It is too good to be true

ही वस्तुस्थिती आहे की, सत्यापेक्षा असत्य नेहमीच आनंददायी असते. उपदेशापेक्षा आनंद देणारी गोष्ट नेहमीच चांगली वाटते. सत्य इतिहासापेक्षा एखादी आठवण अधिक मनोरंजक वाटते. विधायक कामापेक्षा निरुपयोगी

गोष्ट आकर्षित करणारी वाटते.

हीच गोष्ट आहे जी माणसाला धोक्यात ठेवते. अशा परिस्थितीत माणसाची नेहमीच कसोटी असते. प्रत्येक वेळी त्याने जागरूक राहिले पाहिजे. त्यामुळे असत्याच्या धोक्यापासून त्याची फसगत होऊन तो सत्यापासून वंचित राहणार नाही. धोकादायक गोष्टीपासून प्रामाणिक गोष्टी त्याने अमान्य करू नयेत. खोट्या शब्दांच्या जाळ्यात अडकून उडी मारल्यास तो अशा खड्ड्यात पडेल की, जेथून बाहेर येणे त्याला अशक्य होईल.

या जगातील यशासाठी माणसाने आनंददायी गोष्टीपासून प्रभावित होऊ नये. भक्कम किंवा मजबूत वस्तुस्थितीच्या आधारावर त्याने आपले मत बनवावे. या कसोटीवर जो उत्तीर्ण होतो तोच खरा माणूस.

# मृत्युची समस्या

१९ नोव्हेंबर, १९९४ रोजी दिल्लीच्या सर्व वृत्तपत्रान प्रसिद्ध झाले होते की, जनरल बिपिनचंद्र जोशी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे वय ५९ वर्षांचे होते. मृत्यु झाला त्यावेळी ते आर्मीप्रमुख होते. दीर्घकाळ सेवा केल्यानंतर ते आपल्या प्रगतीच्या अंतिम टप्प्यावर होते. आणि मृत्युसमयी ज्येष्ठ अधिकारी होते. १८ नोव्हेंबर रोजी गोल्फ खेळल्यानंतर त्यांच्या छातीत दुखू लागले. त्यानंतर ते बेशुद्ध झाले. त्यांच्यावर तातडीने औषधोपचार करण्यात आले. परंतु ते पुन्हा शुद्धीवर आले नाहीत. बेशुद्धावस्थेतच त्यांना मृत्यु आला.

भारतातील लष्कर सेवेमध्ये सैनिक वयाच्या ३५ व्या वर्षी निवृत्त होतो आणि अधिकारी वयाच्या ४८ व्या वर्षी. दर वर्षी ७0.000 लोक निवृत्त होतात. जनरल जोशी नेहमी म्हणत असत. आजचा सैनिक हा उद्याचा माजी सर्व्हिसमन आहे.

Today's soldier is tomorrow’s ex-serviceman

जनरल जोशी यांनी अधिक विचार केला असता तर ते म्हणाले असते, आजचा सैनिक अंतिम दिवसाचा निवासी आहे. दोघांनाही मृत्युनंतर अंतिम दिवसाच्या कसोटीसाठी तयारी करावयाची आहे. त्यानंतरच निर्णय होईल, की

कोण कसा होता आणि कोण अयशस्वी होता. लोक मृत्युपूर्वीच्या जीवनात गुरफटलेले असतात. वास्तविक मृत्युपश्चात जीवनाबाबतीत त्यानी सर्वाधिक विचार करावा. यातच शहाणपण आहे. लोक दुसऱ्याच्याद्वारे होणाऱ्या गोष्टींना महत्त्व देतात. वास्तविक परमेश्वराच्या गोष्टींना अधिक महत्त्व दिले पाहिजे. लोक या जगातील अडचणीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत असतात. यापेक्षा त्यांनी परमेश्वराच्या कसोटीची चिंता करावी.

# मृत्युचे दुःख

प्रत्येक स्त्री, पुरूषासाठी मृत्यु अटळ आहे. मृत्युच्या बाबतीत सर्वाधिक दु:खद गोष्ट आहे की, मृत्युनंतर वर्तमान जगात पुन्हा परत येणे शक्य नाही. मृत्युनंतर माणसास शाश्वत जगात वास्तव्य करावयाचे आहे. मृत्युनंतर केवळ भोग आहे. कृत्य नाही. माणूस एक संवेदनशील (sensitive) प्राणी आहे. माणूस कोणत्याही प्रकारची जबरदस्ती सहन करू शकत नाही. प्रत्येक स्त्री आणि प्रत्येक पुरुष याने विचार केला पाहिजे की मृत्युनंतर जर त्याला कठीण अवस्थेत राहावे लागले तर ते त्यास कसे सहन करता येईल जर माणसाने यावर विचार केला तर त्याच्या जीवनात एक परिवर्तन घडून येईल. पवित्र कुरआनात म्हटले आहे की, स्वर्गात जाणारे लोक ज्या वेळी स्वर्गात प्रवेश करतील त्या वेळी ते म्हणतील "अल्लाहची ही कृपा आहे की, त्याने आमचे दु:ख दूर केले." त्रासदायक जीवन माणूस सहन करू शकत नाही. जीवन त्रासदायक (painful) नसावे. असे प्रत्येक माणसाला वाटते. यावर माणसाने विचार केला तर मृत्यु त्याच्यासाठी एक काळजीचा विषय होईल. तो मृत्युच्या बाबतीत जीवनापेक्षा अधिक विचार करत राहील. मृत्युची प्रतिमा एक मास्टरस्ट्रोक (masterstroke) आहे. ही प्रतिमा निर्माण झाली तर त्याच्या विचारसरणीत परिवर्तन होईल. त्याच्या जीवनात एक अशी क्रांती होईल, की ती एक चांगली व्यक्ती होऊ शकेल. म्हणून माणसाने मृत्युकडे दुर्लक्ष करू नये. मृत्युच्या आठवणीमुळे माणूस सदैव जागरूक राहातो.

# मृत्युचा संदेश

भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचे २७ जुलै, २०१५ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८३ वर्षांचे होते. ते नवी दिल्ली येथून विमानाने शिलाँग येथे गेले. त्यांचा तेथे विज्ञानाच्या एका विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तेथे भाषण करत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते व्यासपीठावरच कोसळले. त्यांना तातडीने इस्पितळात नेण्यात आले. तिथे डॉक्टरांनी जाहीर केले की, डॉ. कलाम यांचे निधन झाले आहे.

Former President Abdul Kalam died on July 27, while delivering a lecture at IIM Shillong. He was in Shillong to attend a course on Livable Planet Earth at Indian Institute of Management. The former President suddenly collapsed during the lecture. He was rushed to Bethany Hospital in Shillong only to be declared by doctors that he was no more.

मृत्यु एक अशी घटना आहे जी प्रत्येक व्यक्तीसाठी अटळ आहे. प्रत्येकाच्या जीवनात हा क्षण येत असतो. मृत्युचा दूत त्याच्या समोर येतो आणि सांगतो. की हे माणसा तुला या जगात केवळ ८३ वर्षेच जगावयाचे आहे. ती मुदत आता पूर्ण झाली आहे. आता तुला दुसऱ्या जगात जीवन व्यतीत करावयाचे आहे. तेथे निरंतर राहावयाचे आहे. आता जीवनाचा एक टप्पा पूर्ण झाला आहे आणि दुसरा टप्पा सुरू होत आहे जो न संपणारा आहे. प्रत्येक माणसास हे माहित आहे की, मृत्युपूर्वीच्या टप्प्यात त्याला आपल्या जीवनात यश प्राप्त करण्यासाठी कार्य करावयाचे असते. मात्र या गोष्टीकडे कोणत्याही व्यक्तीचे लक्ष नाही की, मृत्युपश्चात टप्प्यासाठी त्याने कोणती तयारी केली पाहिजे जी तेथील त्याच्या शाश्वत जीवनात उपयोगी पडणार आहे. माणसाची हीच सर्वाधिक मोठी समस्या आहे, पण याची त्याला जाणीव नाही. तो जगातील अपयशापासून स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी काही करत असतो. परंतु अंतिम दिवसाच्या अपयशापासून स्वत:स सुरक्षित ठेवण्यासाठी तो काही करत नाही. जाणीव असून अथवा जाणीव नसून देखील।

# मृत्युची घटना

पैगंम्बर मुहम्मद (स.) यांनी फर्मावले आहे की, मृत्युची प्रकर्षाने आठवण करा. ती सर्व प्रकारचे आस्वाद संपुष्टात आणते. म्हणजेच मृत्यु माणसाच्या सर्व आकर्षणांचे (worldly aspirations) खंडण करते. जगातील सर्व प्रकारच्या आशाआकांक्षा संदर्भात या हदीसमध्ये निर्देश करण्यात आला आहे. याचाच अर्थ असा की, जर माणसामध्ये मृत्युसंबंधी उत्कट भावना असेल, तर मृत्युपूर्वीच्या जीवनात भौतिक आकर्षणापेक्षा (worldly attachment) मृत्युपश्चात जीवनास तो अधिक महत्त्व देईल. त्याची विचारसरणी अंतिम दिवसाच्या दिशेने (akhirat oriented) प्रभावित होईल. या सर्व विचारसरणीचा परिणाम असा असेल की, त्याच्या आशाआकांक्षा, त्याची धावपळ, त्याचे नियोजन सर्व काही अंतिम दिवसाशी निगडित असेल. जो माणूस मृत्युकडे दुर्लक्ष करतो तो या वर्तमान जगासच सर्व काही समजतो. त्याच्या विचारसरणीवर फायदा आणि तोटा याचाच प्रभाव असतो. मृत्यु एक असे वास्तव आहे ज्याचे आकलन (thinking) झाले तर माणसाच्या जीवनात एक परिवर्तन घडून येईल. तो सतत त्या दिवसाचाच विचार करत राहील, ज्या दिवशी सर्व लोकांना जगाच्या निर्मात्यासमोर उभे करण्यात येईल. त्याला याची काळजी वाटू लागेल, की तो अल्लाहाच्या पकडीतून कोणत्या प्रकारे स्वतःला सुरक्षित ठेऊ शकतो. त्यास नरकाची सर्वाधिक भीती वाटेल आणि स्वर्गाकडे तो आकर्षित होईल. आशाआकांक्षा आणि दुःखाच्या त्याच्या भावना यामधे बदल घडून येईल. त्याची विचार करण्याची पद्धत आणि त्याची कृती यांवर अंतिम दिवसाचा परिणाम दिसून येईल.

# मृत्युची प्रतिमा

एखाद्या व्यक्तीने आपल्या मृत्युचे स्मरण केले तर त्याचे यामुळे जीवनास्वादावर अंकुश राहील असे एका हदीस मध्ये म्हटले आहे. त्याच्यासाठी कोणत्याही प्रकारचे आकर्षण राहणार नाही. ज्या भौतिक गोष्टीमुळे त्याला आनंद होतो, त्या गोष्टीमुळे त्याला आनंद होणार नाही. मृत्युची प्रतिमा म्हणजे तुमच्यावर एक असा दिवस येणार आहे, ज्यामुळे अचानक तुमच्यामध्ये सर्वंकष परिवर्तन होणार आहे. तुम्ही स्वत:च बनवलेल्या घरात असाल. तुम्ही तुमच्या मुलाबाळांमध्ये आनंदी असाल. तुम्ही तुमच्या मित्रांच्या आणि व्यावहारिक जीवनात असाल. अथवा आणखी कोणत्याही अवस्थेत असाल. अशा वेळी अचानक मृत्यु चालून येईल. तो तुमच्या शरीरास एखाद्या सालीप्रमाणे फेकून देईल आणि तुमच्या खऱ्या अस्तित्वास घेऊन तुम्हाला दुसऱ्या जगात घेऊन जाईल. तुम्हाला जाणणाऱ्यांना तुम्ही कोठे गेला याबद्दल काहीच कल्पना येणार नाही. मृत्युची ही प्रतिमा माणसास खूपच गंभीर बनवते. 'मी कोण आहे आणि माझे भवितव्य काय' यावर माणूस विचार करू लागतो. माझे जीवन म्हणजे काय? माझा मृत्यु म्हणजे काय? मृत्युपूर्वीच्या जीवनाच्या टप्प्यात मला काय करावयाचे आहे. मृत्युनंतरच्या टप्प्यात माझ्यासाठी काय आहे? मृत्युसंबंधी अशा प्रश्नांमुळे माणूस येथील जीवनाच्याबाबतीत अत्यंत गंभीर बनतो. प्रत्येकवेळी तो आपल्या जीवनशैलीचा आढावा घेत असतो. मृत्युमुळे हे लक्षात येते की, तुमचे येथील जीवन तुमच्या ताब्यात असले तरी तुमचे भावनिक जीवन तुमच्या ताब्यात नाही आणि म्हणून मृत्युपश्चात जीवनाबाबतीत तो अधिक दक्षता बाळगतो.

# जीवनास्वाद

पैगंम्बरांची एक हदीस आहे, माणसाने मृत्युच्या वास्तवाचे जर पूर्णपणे गांभीर्याने स्मरण केले, तर जीवनाकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टीकोनात (focus) बदल होईल. त्याचे जीवन जगाकडे पाहणारे जीवन राहणार नाही तर ते अंतिम दिवसाकडे पाहणारे जीवन असेल.

ज्यावेळी एखादी व्यक्ती जगावर श्रद्धा ठेवण्याच्या मार्गाचा अवलंब करते, त्यावेळी ती व्यक्ती जगातील कमाईचीच चिंता करत राहते. त्याला आपल्या उद्योगात मग्न राहण्यात एक प्रकारचा आस्वाद मिळतो. तो शानदार भवितव्याची शक्यता पाहत असतो. परंतु ज्यावेळी त्याला हे माहित होते की, त्याच्या जीवनात एक दिवस असा येणार आहे की ज्या दिवशी त्याला आपली सर्व कमाई सोडून जगातून जावे लागणार आहे त्यावेळी त्याला आपल्या उद्योगात काही स्वारस्य राहणार नाही. एक नवीन विचार जागृत होण्याचे ते माध्यम होते. जर माझी कमाई मृत्युनंतर माझ्या बरोबर जाणार नसेल तर मला माझ्या कार्यपद्धतीचा मार्ग बदलावा लागेल.

सत्य हे आहे की मृत्युचे स्मरण माणसासाठी पुन्हा देण्यात आलेली एक सूचना (reminder) आहे. मृत्युचे स्मरण त्याचे समर्थन करणारे आहे. मृत्युचे स्मरण माणसास गंभीर आणि वस्तुनिष्ठ बनवते. मृत्यु माणसास आठवण करुन देतो की एक दिवस मानवी जीवनातून बाहेर पडून त्याला निर्मात्याच्या जगात जाणे आहे. हा विचार माणसासाठी स्वतःमध्ये दुरुस्ती करण्याचे (self correction) एक माध्यम आहे.

# मृत्युची शिकवण

मी एका प्रेतयात्रेसाठी गेलो होतो त्यावेळी पाहिले की, मृत्यु झालेल्या व्यक्तीस आंघोळ घालण्यात आली. नव्या कापडाचे कफन घालण्यात आले. लोकांनी उभे राहून त्याची अखेरची नमाज: नमाजे जनाजा अदा केली. त्यानंतर त्याला आपल्या खांद्यावर घेऊन ते निघाले. कबरीमध्ये अत्यंत हळुवारपणे मृतदेह ठेवण्यात आला आणि त्यावर माती टाकण्यात आली. मी विचार करू लागलो. एका मृत व्यक्तीसाठी इतक्या आदरभावनेची आज्ञा इस्लामने का दिली? वस्तुस्थिती तर अशी आहे की मृत्युनंतर माणसाच्या शरीराची माती होते. मात्र ही माती दुसरीकडे फेकण्यात येत नाही.

मरण पावलेल्या व्यक्तीपासून जिवंत व्यक्तीस त्याची अखेर कशी होणार आहे याचे उदाहरण देण्यात येते. जिवंत लोकांनी मृत्यु पावलेल्या व्यक्तीकडे पाहावे. ही इस्लामची शिकवण आहे. मृत्युपूर्वीच त्याने मृत्युचा अनुभव घ्यावा. अत्यंत आदरभावनेने मृत माणसाच्या प्रेतयात्रेची तयारी करतात आणि त्यास घेऊन जातात. दुसऱ्या टप्प्यात आल्यानंतर त्याला कबरीमध्ये ठेवण्यात येते, प्रेतयात्रेत सामील झालेला प्रत्येक माणूस आपल्या मुठीत माती घेतो. ती माती मृत व्यक्तीच्या चेहऱ्याच्या दिशेने टाकण्यात येते. ज्यावेळी पहिल्यांदा तो माती टाकतो त्यावेळी म्हणतो:

१) ‘मिन:खलक्नाकुम’ म्हणजे आम्ही तुम्हाला यापासून निर्माण केले. ज्यावेळी तो दुसऱ्यांदा माती टाकतो त्यावेळी तो म्हणतो :

२) ‘वफिहानोइदुकुम’ म्हणजे पुन्हा आम्ही त्यामध्ये तुम्हाला दुसऱ्यांदा टाकत आहोत. तिसऱ्यांदा माती टाकताना तो म्हणतो :

३) ‘वमिन:नुख्रजुकुम तारतनउखरा’ म्हणजे यातूनच तुम्हाला पुन्हा बाहेर काढण्यात येईल.

तीन वेळा अशा प्रकारे माती टाकणे हा या सर्व प्रक्रियेचा कळस आहे. अशा प्रकारे एका उदाहरणावरुन माणूस म्हणजे काय? त्याची अखेर काय? हे निर्देशित करण्यात येते.


# ख्यातनाम अब्जोपती

होअर्ड रोबार्ड ह्युज (Howard Robard Hugues) अमेरीकेमधील एक अब्जोपती! एप्रिल १९७६ मध्ये विमानातून प्रवास करताना त्याला हृदयविकाराचा झटका आला. त्याचे विमान तातडीने हौस्टन येथे उतरवण्यात आले. परंतु इस्पितळात दाखल करण्यापूर्वीच त्याचे निधन झाले. आपल्या कायदेतज्ज्ञ वडिलांकडून त्याला १ दशलक्ष डॉलर येवढी रक्कम वारसाहक्क म्हणून प्राप्त झाली होती. परंतु आपल्या कौशल्याने त्याने उलाढाल केली. २० कोटी डॉलरपेक्षा जास्त उलाढाल झाली. त्याच्या बरोबर सामील विमानाचा ताफा होता. त्यानी त्याच्या शेवटच्या क्षणाबद्दल जी प्रत्यक्ष माहिती दिली. त्यावर आधारित प्रसिद्ध आर्टिस्ट सरल सालोमान याने पटकथा तयार केली. त्या पटकथेमध्ये सदरहू अब्जोपतीच्या शेवटच्या क्षणाचे दर्शन घडवण्यात आले आहे. अमेरीकेतील हा यशस्वी व्यापारी या पटकथेमध्ये उदासी, बेचैन, अपयशी आणि अविश्वास याचा संग्रह आहे असे प्रदर्शित होते.


अमेरिकेतील ही एका अब्जोपतीची मुद्रा जी कैफियत प्रदर्शित करते, ती सर्वसामान्य माणसाची आहे. ज्यावेळी तो मृत्युच्या दारात पोहोचतो, त्यावेळी पुढील शाश्वत जीवनात दाखल होण्यासाठी त्याला अशा प्रकारे जीवन मागे सोडावे लागते.

# अखेरची नमाज : ''नमाजे जनाजा''

दिल्लीत एका मुसलमानाचे निधन झाले. त्याच्या मृत्युनंतर अखेरची नमाजे जनाजा अदा करण्यात आली. त्याचे एका स्थानिक कबरस्तानात दफन करण्यात आले. माझ्या एका साथिदाराने सांगितले की ते या नमाजमध्ये सामील होते. नमाज सुरू होणार त्या क्षणी त्यांच्या बाजूला उभ्या असलेल्या एकाने त्याना विचारले, "अनिवार्य (फर्ज) नमाज की अतिरिक्त (सुन्नत) नमाजचा संकल्प करू.' ते हैराण झाले. त्यानंतर त्यांनी त्या व्यक्तीस सांगितले की, "कोणत्याही मृत्यु पावलेल्या व्यक्तीसाठी नमाज (नमाजे जनाजा) अदा करणे ही एखादी प्रथा नाही. ती एका गंभीर वस्तुस्थितीची आठवण आहे." हे सत्य आहे की ज्याचा मृत्यु झाला त्याचप्रमाणे सर्वांचा मृत्यु होणार आहे. मृत्यु झालेल्या व्यक्तीसाठी सामुदायिक नमाज अदा करणे म्हणजे दुसऱ्याच्या मृत्युमध्ये स्वतःच्या मृत्युचे स्मरण करणे. मृत्यु झालेल्या व्यक्तीप्रमाणेच माझ्यावरदेखील प्रसंग येणार आहे. मृत्यु पाहून जी व्यक्ती अशा प्रकारे विचार करते त्याला नमाजे जनाजाच्या वेळी 'मी स्वत: माझी ''नमाजे जनाजा'' अदा करत आहे.' असे वाटावे. मृत्यु एखाद्या व्यक्तीवरच येणारा प्रसंग नाही. मृत्यु प्रत्येक स्त्री आणि प्रत्येक पुरुषासाठी निश्चित आहे. कोणासही विचारून मृत्यु येत नाही. मृत्यु अचानक येतो. ज्यावेळी मृत्यु येतो त्यावेळी त्याला परत फिरवता येत नाही. मृत्यु एक अटळ वास्तव आहे. प्रत्येक माणसाने प्रत्येक क्षणी मृत्युचे स्मरण करावे. माणूस संवेदनशील आहे (sensitive) दुसऱ्याचा मृत्यु पाहूनदेखील स्वत:चा मृत्यु ज्यास आठवत नाही तो एखाद्या दगडाप्रमाणे (insensitive) निर्दय आहे. प्रत्यक्षात तो माणूस! मात्र त्याच्यात माणसाचे गुणविशेष नाहीत.




**Spirit of Islam**
002, HM Wimberly, 6, Barlie Street Cross, Langford Town, Bangalore - 560025
**Mob.:** +91-8050202626 / **Email :** subscription @thespiritofislam.org
**Web :** www.spiritofislam.co.in



Born in 1925, in Azamgarh, Uttar Pradesh, is an Islamic spiritual scholar who is well-versed in both classical islamic learning and modern disciplines. The mission of his life has been the establishment of worldwide peace. He has received the Padma Bhushan, the Demiurgus Peace International Award and Sayyidina Imam-Al-Hassan Peace Award for promoting peace in Muslim societies. He has been called 'Islam's spiritual ambassador to the world and is recognized as one of it's most influential Muslims. His books have been translated into sixteen languages and are part of university curricula in six countries. He is the founder of the Centre for peace and Spirituality based in New Delhi.

**Maulana**

# Wahiduddin Khan


Towards Global Peace and Spiritual Living

**SMS for a complimentary copy :** 08050202626

**Email :** thecentreforpeace@gmail.com / **Web.:** www.cpsglobal.org